RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
१० शुक्रवार एप्रिल २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक ३१४
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

## सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना 31 मार्च 2027 पर्यंत स्थगिती



■ जनगणनेच्या या राष्ट्रीय कार्यात कोणताही प्रशासकीय व्यत्यय येऊ नये, यासाठी राज्यांच्या मुख्य सचिवांनी आपापल्या स्तरावर याबाबतचे तातडीने आदेश काढावेत. 'जनगणना २०२७' साठी नियुक्त केलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याची ही जनगणना पूर्ण होईपर्यंत म्हणजे ३१ मार्च २०२७ पर्यंत बदली केली जाणार नाही. याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे गृहसचिव गोविंद मोहन यांनी या पत्रात नमूद केले आहे. यामुळे यंदा जनगणनेसाठी नियुक्त केलेल्या शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या बदल्या जनगणनेचे काम पूर्ण होईपर्यंत होणार नाहीत हे स्पष्ट झाले आहे.

**विदर्भ केसरी। परळी वैजनाथः**

सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना ३१ मार्च २०२७ पर्यंत स्थगिती देण्यात आलेली आहे. केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन यांनी याबाबतचे निर्देश दिले आहेत. देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना यासंदर्भात पत्र पाठवण्यात आलेलं आहे.

केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन यांनी या पत्रात म्हटले आहे की, देशात आगामी जनगणनेची तयारी युद्धपातळीवर सुरू आहे. विशेष म्हणजे ही जनगणना पूर्णपणे डिजिटल स्वरूपात होणार असून, नागरिकांना 'स्वयं-गणनेची' सुविधाही उपलब्ध असणार आहे. ही प्रक्रिया दोन टप्प्यांत होणार आहे. पहिला टप्पा घरनोंदणी आणि घरांची गणना असा असेल. एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत राज्य सरकारने निश्चित केलेल्या ३० दिवसांच्या कालावधीत हा टप्पा पूर्ण केला जाणार आहे तर दुसरा टप्पा प्रत्यक्ष लोकसंख्येची गणना आहे. दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये राबवला जाईल.

सध्या राज्य, जिल्हा, तहसील आणि प्रगणक गट स्तरावर जनगणना अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया बहुतांश राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू झाली आहे. या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणही सुरू करण्यात आले आहे. जनगणना कायदा १९४८ आणि जनगणना नियम १९९० अंतर्गत या अधिकाऱ्यांना अत्यंत महत्त्वाची आणि वैधानिक कर्तव्ये पार पाडावी लागतात. त्यामुळे एकदा अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यानंतर जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया संपेपर्यंत त्यांना त्यांच्या पदावरून हटवले जाऊ नये, अशी स्पष्ट भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे.

## भोंदूबाबा अशोक खरातला तिसऱ्या गुन्ह्यात 5 दिवसांची पोलिस कोठडी

**विदर्भ केसरी।**

नाशिकमधील बहुचर्चित आयटी हब आणि अत्याचार प्रकरणातील मुख्य संशयित भोंदूबाबा अशोक खरात याच्या अडचणीत वाढ झाली आहे. खरातला आज नाशिक सत्र न्यायालयाने तिसऱ्या गुन्ह्यात 5 दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. यापूर्वीच्या दुसऱ्या गुन्ह्यातील 7 दिवसांची कोठडी संपल्यानंतर त्याला न्यायाधीश बी. एन. इचपुराणी यांच्या न्यायालयात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले होते. सुनावणीदरम्यान तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयात खरातच्या कार्यपद्धतीचा पर्दाफाश केला. आरोपी लोकांना नकली साप आणि वाघाची भीती दाखवून लुटत होता. मंतरलेले खडे आणि चिंचोके विकून त्याने अनेकांची फसवणूक केली आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, महिलांना वश करण्यासाठी तो त्यांना विशिष्ट प्रकारचे द्रव्य किंवा पेढे खाऊ घालत असे. या पदार्थांमध्ये नक्की काय मिसळले जात होते आणि ते कुठून आणले जात होते, याचा तपास करणे आवश्यक आहे, असे पोलिसांनी न्यायालयात सांगितले.

## 12 हजार शेतकरी आधारभूत किंमतीपासून वंचित

**विदर्भ केसरी। अलिबाग -**

कोकणातील भात उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या रायगड जिल्ह्यात यंदाच्या हंगामात भात खरेदीत मोठी घट नोंदवली गेली आहे. पावसाचा लांबलेला कालावधी, सततचा ओलावा आणि कापणीच्या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे भात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

## आठ घरांना भीषण आग ; आठ कुटुंबे उघड्यावर

**विदर्भ केसरी। कोळवण :**


बुधवार( ता. ८) हा दिवस मुळशी तालुक्यातील भालगुडी गावातील लव्हाळवाडी ग्रामस्थांसाठी काळा दिवस ठरला. आठ घरांना लागलेली भीषण आगीने आठ कुटुंबे आज उघड्यावर आली आहेत. वर्षभरासाठी साठविलेले अन्नधान्य सह घरातील सर्व वस्तू डोळ्यासमोर जळून खाक झालेले आहे. उभे आहेत त्या फक्त पडलेल्या भग्न भिंती.... या घटनेने वाडीत भयान शांतता पसरली आहे. कोणी कोणाला धिर द्यायचा हेच समजत नाही अशी स्थिती झालेली आहे.

या कुटुंबांनी कष्टाने उभा केलेला संसार उद्धवस्त झाला उरला होता तो फक्त काळा धूर राख आणि राख... घरगुती साहित्य व शेतीचे अवजारांचं कोळसा झाला आहे. घरातील भांडी कुंडी वितळून गेली आहेत. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. या आगीचे नेमके कारण समजू शकले नाही मात्र आग शॉर्ट सर्किटने लागली असावी असे ग्रामस्थांचे म्हणणे होते. रात्री उशिरापर्यंत धुमसत असलेली आग विझवण्याचे कामे काम सुरु होते.कालपासून तालुक्यातून मदतीचा हात मिळण्यास सुरुवात झाली आहे.सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी तालुक्यातील ग्रामस्थ घटनास्थळी भेट देऊन धीर देण्याचे काम करीत आहेत.शासनाने त्वरित प्राथमिक स्वरूपात मदत देऊन पावसाळ्याच्या पूर्वी घरी बांधून द्यावीत अशी मागणी संतोष बबन साठे (घर जळलेले ग्रामस्थ) यांनी केली आहे.महसूल विभागामार्फत नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहे. आर्थिक मदत व जिवनावश्यक वस्तू देण्यासाठी दानशूर व्यक्तींनी घेतला पुढाकार...

### पावसाळ्यापूर्वी डोक्यावर छप्पर मिळणार का??

■ पावसाळा अवघ्या दोन महिन्यांवर आला आहे या कुटुंबांना डोक्यावर छप्पर मिळून ती नव्या घरात कधी जाणार? हा मोठा प्रश्न आवासून उभा आहे.खरीप हंगाम पूर्व मशागतीची कामे सुरू होण्यापूर्वीच हे संकट ओढावले आहे. बी बियाणं सह जळून खाक झाले आहेत. आत्ता या कुटुंबांना विविध स्तरातून तातडीने मदतीची आवश्यकता आहे. एक मदतीच्या हाताची गरज आहे.

## भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू



**विदर्भ केसरी। हिंगोली:**

कळमनुरी तालुक्यातील चुंचा गावाजवळ बुधवारी मध्यरात्री दोन मालमोटारांची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत बिहार राज्यातील दरभंगा येथील दोन जणांचा जागीच मृत्यू झाला.

कळमनुरी तालुक्यातील वारंगा-हदगाव राष्ट्रीय महामार्गावर चुंचा शिवारात ८ एप्रिल रोजी रात्री सुमारे १ वाजता दोन वाहनांची (बीआर-०७-जीसी ३२५१ व एमएच-२१-बीएच ५२७१) जोरदार धडक झाली. दोन्ही वाहने एकाच दिशेने येत असताना हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघात इतका भीषण होता की वाहनातील खुर्शीद आलम अब्दुल गणी (३६) व अमजद अली मोहम्मद अली (२६, दोघेही रा. नारी, दरभंगा, बिहार) यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच आखाडा बाळापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह अडकल्याने जेसीबीच्या सहाय्याने ते बाहेर काढण्यात आले. या प्रकरणी उशिरा रात्री अपघाताची नोंद करण्यात आली आहे.



## लखनौ सुपर जायंट्सचा 'टायगर'!

**विदर्भ केसरी।**

आयुष बदोनीची विकेट पडली तेव्हा लखनौ सुपर जायंट्सच्या ६ बाद १२६ धावा झाल्या होत्या. अशा परिस्थितीत कोलकाता नाइट रायडर्सच्या विजयाच्या टक्केवारी ९५ इतकी होती, तर LSG च्या विजयाच्या ५ टक्केच अपेक्षा होत्या. पण, मुकुल चौधरी मैदानावर उभा राहिला आणि अनपेक्षित कामगिरी करून LSG ला रोमहर्षक विजय मिळवून दिला. विजयी धाव घेतल्यानंतर मुकुलने आकाशाकडे पाहिले आणि हात जोडून देवाचे आभार मानले.

राजस्थानचा हा २१ वर्षीय फलंदाज मोठ मोठे षटकार मारण्यासाठी प्रसिद्ध होता आणि आज त्याने त्याच्या नावाची चर्चा का होतेय, हे दाखवून दिले. अजिंक्य रहाणे ( ४१), अंगकृश रघुवंशी ( ४५), कॅमेरून ग्रीन ( नाबाद ३२) व रोव्हमन पॉवेल ( नाबाद ३९) यांच्या खेळीने कोलकाताने ४ बाद १८१ धावांचा डोंगर उभा केला होता. त्यानंतर कोलकाताच्या गोलंदाजांनी चांगला मारा केला आणि १८व्या षटकापर्यंत सामन्यात पकड घेतली. आयुष बदोनी ३४ चेंडूंत ५४ धावा करून माघारी परतला अन् लखनौच्या विजयाच्या आशा मावळल्या होत्या. पण, अशा वेळी मुकुल मैदानावर उभा राहिला. शेवटच्या २४ चेंडूंत ५४ धावा हव्या असताना मुकुल आवेश खानला सोबतिला घेऊन उभा राहिला. तरीही कोलकाताने १२ चेंडूंत ३० सामना असा अवघड ठेवला होता. पण, मुकुलने १९व्या षटकात कॅमेरून ग्रीनला १६ धावा कुटल्या आणि नंतर २०व्या षटकात दोन निर्धाव चेंडू खेळूनही रोमहर्षक विजय मिळवून दिला. पाचव्या चेंडूवर षटकार खेचला अन् शेवटच्या चेंडूवर एक धाव घेत LSG साठी नायक ठरला...

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

!! पाहिजेत !!

**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

पात्रता आणि आवश्यकता:


पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

■ शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर
■ आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.
■ एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९

## बारामती पोटनिवडणुकीत काँग्रेसची माघार

**विदर्भ केसरी।**



बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठी राजकीय घडामोड समोर आली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यात झालेल्या चर्चेनंतर काँग्रेसने बारामतीतून उमेदवार मागे घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली होती. अखेर अनेक घटना-घडामोडींच्यानंतर काँग्रेसने अखेर निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ही माहिती दिली. या घडामोडीमुळे बारामतीतील निवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा विजयाचा मार्ग अधिक सुखकर झाला आहे.

बारामतीत एकूण 53 उमेदवारांचे अर्ज कायम होते. यापैकी 30 उमेदवारांनी माघार घेतली असली तरी अद्याप 23 उमेदवार हे रिंगणात कायम आहेत. त्यामुळे बारामतीत बिनविरोध निवडणूक होणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. मात्र आता काँग्रेस पक्षाच्या माघारीमुळे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा विजयाचा मार्ग अधिक सुखकर झाला आहे. सपकाळ यांनी अजित पवार यांच्या अपघातासंदर्भात काँग्रेसची भूमिका पुन्हा अधोरेखित केली. एवढ्या मोठ्या नेत्याच्या अपघाताची योग्य चौकशी व्हायला हवी. एफआयआर दाखल होणे गरजेचे आहे आणि त्यासाठी आम्ही पाठपुरावा सुरू ठेवणार आहोत, असे ते म्हणाले. तसेच पार्थ पवार यांच्या वक्तव्यामुळे निर्माण झालेल्या नाराजीबाबत दिलगिरी व्यक्त करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसने अखेर माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गुरुवारी गांधी भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. मात्र, निवडणुकीतून माघार घेतली असली तरी कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा देणार नसल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. त्यामुळे या निर्णयानंतरही राजकीय समीकरणांमध्ये अनिश्चितता कायम असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात एखाद्या नेत्याचे निधन झाल्यानंतर त्या ठिकाणची निवडणूक ही त्यांच्या कुटुंबासाठी बिनविरोध करण्याची परंपरा आहे. त्या दृष्टिकोनातून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी चर्चा केली आहे.



दैनिक विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी
शुक्रवार, १० एप्रिल २०२६ | २

# वर्षभरात एक्साईजने उधळले तस्करांचे मनसुबे

## यवतमाळचा 'दबदबा' : वर्षभरात एकुण ७ हजार ९३४ आरोपींना अटक, मुद्देमाल हस्तगत करण्यात यवतमाळ जिल्हा टॉप, अमरावती सेकंड

▸विदर्भ केसरी। यवतमाळ

**: गेल्या काही काळापासून विदर्भात बनावट मद्य तस्करांनी धुमाकूळ घातला आहे. असे असतानाच राज्य उत्पादन शुल्क विभागाने (एक्साइज) आपले जाळे घट्ट करत तस्करांचे इरादे पूर्णपणे उधळून लावले आहेत. विभागाच्या 'नियोजनबद्ध' कारवायांमुळे अनेक बड्या तस्करांना आता 'अंडरग्राउंड' होण्याची वेळ आली आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात (१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६) अमरावती विभागात तब्बल १० कोटी ८५ लाख ४३ हजार २०७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून विभागाने आपला दरारा सिद्ध केला आहे.**



**"अवैध मद्याची अचूक माहिती मिळाल्यास विभाग निश्चितपणे कठोर कारवाई करेल," ग्रामीण भागातील हातभट्टी आणि अवैध साठे मुळासकट उपटून काढण्यासाठी नागरिकांनी पुढे येऊन गुप्त माहिती देणे आवश्यक आहे. अशा सहकार्यामुळेच गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणे अधिक सुलभ होईल**

**-डॉ. पराग नवलकर, विभागीय उपआयुक्त अमरावती**

| जिल्हा कार्यालय | एकुण गुन्हे | वारस | अटक आरोपी | जप्त वाहन | जप्त मुद्देमालाची किंमत | हातभट्टी मद्य वरील कारवाई निर्मिती / वाहतुक/ विक्री | जप्त मुद्देमालाची किंमत | बनावट मद्य वरील कारवाई | जप्त मुद्देमालाची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अमरावती | २१०२ | २०१६ | २३११ | ९६ | २२८५०८०३ | ८२१ | १५४२१४३१ | २ | ३२५२४९० |
| अकोला | ९६८ | ९६८ | ९७४ | ४७ | १०६७३१४५ | २४३ | ५०४०७२० | ० | ० |
| यवतमाळ | १९२४ | १८३३ | १९३० | ८३ | ३४३३७१४६ | १०५८ | १५५८५१२८ | २ | ६२४०५५ |
| बुलढाणा | १६१६ | १५८३ | १६३६ | १०६ | २५१२३३३२ | ५७८ | ११६८४६७९ | ० | ० |
| वाशिम | ७४६ | ६७९ | ७०२ | १५ | ८६१८१८५ | ३६४ | ६३२१७७० | ० | ० |
| वि.भरारी पथक | ४१० | ३५४ | ३८१ | १८ | ६९४०५९६ | १५३ | ५३०३३०५ | ० | ० |
| **एकुण** | **७७६६** | **७४३३** | **७९३४** | **३६५** | **१०८५४३२०७** | **३२१७** | **५९३५७०३३** | **४** | **३८७६५४५** |

संपूर्ण अमरावती विभागात कारवायांच्या बाबतीत अमरावती जिल्हा २१०२ गुन्हे नोंद करीत २ कोटी २८ लाख ५० हजार ८०३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत आघाडीवर राहिला. तर यवतमाळ जिल्ह्याने दुसरा क्रमांक पटकावला आहे. याशिवाय मुद्देमाल हस्तगत करण्यात यवतमाळनंतर अमरावतीचा नंबर लागतो. विभागात वर्षभरात एकूण ७ हजार ७६६ गुन्हे नोंदवण्यात आले असून, गुन्हेगारांच्या मुसक्या आवळताना ७ हजार ९३४ आरोपींना तुरुंगाची हवा खाण्यासाठी पाठविण्यात आले आहे. विभागाने केवळ गावठी दारूच नव्हे, तर बनावट विदेशी मद्याच्या तस्करांवरही 'सर्जिकल स्ट्राईक' केला आहे. एकट्या हातभट्टी मद्यावरील कारवाईत ३ हजार २१७ गुन्हे दाखल करत ५ कोटी ९३ लाख ५७ हजार ३३ रुपयांचा माल जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे, यवतमाळ जिल्ह्यातून ८३ वाहने जप्त करण्यात आली असून अमरावतीत हा आकडा ९६ वर पोहोचला आहे तस्करांच्या छुप्या मार्गांवर नजर ठेवण्यासाठी ४१० विशेष भरारी पथके कार्यान्वित आहेत. या पथकांनी ३८१ आरोपींना जेरबंद करून तस्करांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. विभागात यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक ८४० परवानाधारक असून, प्रशासनाने अवैध विक्रीसोबतच

**राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या या धडाकेबाज कामगिरीमुळे गावठी दारूच्या भट्ट्या ओस पडल्या असून, सुरक्षित आणि वैध मद्य विक्रीला प्रोत्साहन मिळत आहे. मात्र, सीमेवरून होणारी अवैध वाहतूक रोखण्याचे आव्हान अद्यापही विभागासमोर आहे.**

परवानाधारक दुकानांवरही कडक देखरेख ठेवली आहे. तर वाशिम जिल्ह्यात सर्वात कमी कारवाई असून तिथे फक्त ७४६ कारवाई ३८१ आरोपींना अटक करण्यात आले असून ६९ लाख ४० हजार ९५६ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. १८ वाहने जप्त करण्यात आली असून ३६४ हातभट्टीवर कारवाई करण्यात आली यात ६३ लाख २१ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## अग्रलेख

# धुपाटण्याचे धनी!

मत्सर आणि भीती या एवढ्याच अशा भावना आहेत की ज्यांच्यापासून कधी आनंद प्राप्त होत नाही.— सी. कॉलीन्स् इराणमधील संपूर्ण संस्कृती नष्ट करू, अशी भयंकर गर्जना करून काही तास उलटायच्या आतच त्या देशाबरोबर दोन आठवड्यांच्या युद्धविरामाला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मान्यता दिली. साऱ्या जगाने यामुळे सुटकेचा निःश्वास टाकला असून, या शस्त्रसंधीचे स्वागतच करायला हवे. याचे कारण हे युद्ध चिघळणे खरोखर कोणाच्याच हिताचे नव्हते. गेले चाळीस दिवस चाललेल्या या युद्धात आपल्या बेभरवशी, तऱ्हेवाईक आणि आत्मकेंद्री कारभारशैलीत ट्रम्प यांनी जे कमालीचे सातत्य राखले, त्याला तोड नाही. याचा कळसाध्याय त्यांनी गाठला तो शस्त्रसंधीला मान्यता देऊन. खरे तर फारसे काही पदरात पडले नसूनही ट्रम्प यांना एका अर्थाने माघारच घ्यावी लागली; पण तसे कबूल करतील तर ते ट्रम्प कसले? शस्त्रांची लढाई संपली की 'नरेटिव्ह'ची जोरात सुरू होते. तेच आता सुरू झाले असून, त्या अनुसार ट्रम्प यांनी आपला विजय जाहीर करून टाकला आहे आणि इराणच्या नेतृत्वानेही अमेरिकी महासत्तेला नमवल्याचा दावा केला आहे. इस्राईलनेही इराणच्या क्षेपणास्त्र व अण्वस्त्रनिर्मितीच्या सर्व क्षमता नष्ट करण्यात यश मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले आणि त्याचवेळी ट्रम्प यांना युद्धासाठी इस्राईलने उद्युक्त केले, हा आरोप फेटाळून लावला. खरे तर युद्ध थांबणे ही तिघांचीही अपरिहार्यता होती. ट्रम्प यांनी हा जो जुगार खेळला, तो अंगाशी आला, याचे कारण दीर्घकाळ युद्धाचा अनुभव असलेल्या इराणने शीर्षस्थानी असलेल्या नेत्याची हत्या झाल्यानंतरही चिवट झुंज दिली. होर्मुझचे भू-राजकीय; विशेषतः सामरिक व्यूहरचनेचे महत्त्व ओळखून त्यांनी तेलवाहतुकीचा मार्ग अडवून धरल्याने सर्वच देशांना त्याची झळ पोचू लागली. तेलाचे दर वाढले आणि त्याचा चटका अमेरिकेसह सर्व देशांना बसू लागला. केवळ डेमोक्रॅटिक पक्षातूनच नव्हे, तर सत्ताधारी रिपब्लिकन पक्षातूनही युद्धाला विरोध होऊ लागला. हा असंतोष राष्ट्रवादाचा गजर करून शामवणे सोपे नाही, हे ट्रम्प यांना कळून चुकले असावे. या युद्धाचा रोजचा खर्च अंदाजे एक अब्ज डॉलर एवढा होता. युद्ध चालू असताना एका जागतिक महासत्तेच्या अध्यक्षाने जो थयथयाट केला, ज्या प्रकारे शिवीगाळ केली, ती सामर्थ्याची नव्हे तर हतबलतेची निदर्शक होती. अमेरिकी जनतेला युद्धाची आवश्यकता पटवून देण्यासाठी "इराण हा दहशतवादाचा पुरस्कार करणारा देश आहे," असे ते वारंवार सांगत होते आणि त्या देशाबरोबरच्या शस्त्रसंधीसाठी मध्यस्थ म्हणून त्यांनी पसंती दिली ती दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला! आता इस्लामाबादेत शुक्रवारी दहा मुद्यांवर चर्चा होणार आहे. त्यात होर्मुझची खाडी खुली करणे, इराणवरील निर्बंध हटवणे, इराणच्या युद्धोत्तर पुनर्बांधणीसाठी आर्थिक योगदान देणे, तेथील युरोनियम शुद्धिकरणाच्या प्रकल्पाचे भवितव्य आदी मुद्यांचा समावेश आहे. होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यास इराणने मान्यता दिली, असे ट्रम्प सांगत असले तरी प्रत्यक्ष वाटाघाटीत काय होते, हे पाहावे लागेल. गेल्या ३९ दिवसांत ट्रम्प यांनी युद्धात पडून नेमके काय साधले? ज्या युरोपच्या संरक्षणाची जबाबदारी अमेरिकेने घेतली होती, त्यांनी ट्रम्प यांना या कसोटीच्या प्रसंगात हिंग लावून विचारले नाही. होर्मुझ सामुद्रधुनी मोकळी करण्यासाठी तेथे युद्धात उतरण्यास स्पष्ट नकार दिला. प. आशियातील सौदी अरेबिया, संयुक्त अरब आमिराती, कतार आदी देश अमेरिकेचे मित्रदेश. पण इराणकडून हल्ले होऊ लागल्यावर या मैत्रीचा काही उपयोग झाला नाही, याचा अनुभव त्यांनी घेतला. जागतिक महासत्तेचा दिमाख आणि दरारा याला उतरती कळा लागण्याची ही लक्षणे आहेत. अमेरिकेतील जीवितहानीचा सरकारने सांगितलेला आकडा तेरा आहे. पण त्यावर कोणी विश्वास ठेवेल, असे वाटत नाही. युद्धादरम्यान केवळ इस्राईलमध्येच नव्हे तर अमेरिकेतही सेन्सॉरशिप होती. खऱ्या बातम्या मिळणे दुरापास्त झाले होते, हे वास्तव आहे. या युद्धाने पुरवठासाखळ्यांवर आघात केला. आयात-निर्यातीवर मोठा परिणाम झाल्याने व्यापाराची घडी विस्कटली. भारतासह विविध देशांवर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला. टंचाई, महागाईचा फेरा त्रस्त करू लागला. आर्थिक विकासदराची गती मंदावली. इराणवर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे तेथील अनेक पायाभूत संरचना उद्‌ध्वस्त झाल्या. महासंहारक रासायनिक अस्त्रांचे कारण देऊन इराकला अक्षरशः उजाड करून टाकणाऱ्या अमेरिकने इराणचीही तीच वाट लावण्याचा 'उद्योग' केला, तो तेलावरील पकड कायम राखण्यासाठी. आपल्या हितसंबंधांसाठी कोणत्याही थराला जायचे आणि त्याला तात्त्विक मुलामा चढविण्यासाठी लोकशाही, मानवी हक्क, दहशतवादविरोध वगैरे भारदस्त शब्दांची रंगरगोटी करायची ही अमेरिकी शैली आजची नाही. ट्रम्प यांनी त्याला आणखी बटबटित आणि भडक स्वरूप दिले. पण त्यांच्या या उपद्व्यापांमुळे चीन, रशिया या प्रतिस्पर्ध्यांचे चांगलेच फावले. आपला प्रतिस्पर्धी चुका करीत असताना त्याच्या 'कामा'त व्यत्यय आणू नका!, ही नेपोलियनची मार्मिक उक्ती चीनने तंतोतंत अवलंबलेली दिसली. या सगळ्या खटाटोपात ट्रम्प यांची' तेल गेले, तूप गेले...' अशी अवस्था झाली. शस्त्रसंधी करताना ते विजयी झाल्याचा आव आणत असले तरी हा हाती आलेले धुपाटणे मिरवण्याचा प्रकार आहे.

# राज्यातील ३४ हजार कलावंतांना यंदा शासनाचा 'मदतीचा हात'...

▸विदर्भ केसरी। मुंबई :



राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बळ कलावंतांची संख्या झपाट्याने वाढत आहे. सरकारच्या वतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत यंदा कमालीची भर पडली आहे.

वर्षभरात ३४ हजार कलावंतांना दरमहा पाच हजार रुपये प्रमाणे मदतीचा हात देण्यात आला आहे. विविध कलाकारांची मोठी परंपरा असलेल्या राज्यातील संगीत, नाटक, लोककला, चित्रकला, शिल्पकला आणि नृत्य क्षेत्रातील कलाकारांना ही मदत दिली जाते. सरकारने यंदा या मदतीवर सुमारे २०४ कोटी खर्च केले.

राज्यातील जेष्ठ आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बळ साहित्यिक व कलाकरांना शासनाच्या वतीने आर्थिक मदत देण्याची योजना (१९५५) जुनी आहे. साहित्यिक व कलाकारांच्या अ, ब, क, ड श्रेणीनुसार ही मदत दिली जात होती. त्यावेळी आर्थिक मदत घेणारे कलाकार अतिशय कमी (६०) होते. आर्थिक अडचणीमुळे अनेक कलाकर हालाखीचे दिवस काढत असल्याचे आढळून आले होते.

शासनाने २०२४ मध्ये या योजनेत सुधारणा केली. कलाकारांसाठी निश्चित करण्यात आलेली श्रेणी रद्द करण्यात आली. सरसकट सर्वच पात्र कलाकारांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. दरमहा आर्थिक मदतीची रक्कम पाच हजार रुपये केली. श्रेणी रद्द केल्याने तसेच रक्कम वाढवली गेल्याने मदत घेणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. संगीत, नाटक, लोककला, चित्रकला आणि शिल्पकला या कला क्षेत्रातील कमीत कमी १५ ते २० वर्षाचा अनुभव असलेल्या कलाकाराला ही आर्थिक मदत दिली जाते. त्यासाठी या कलाकराची आर्थिक स्थिती दुर्बळ आणि ५० वर्षाची अट हे दोन प्रमुख निकष आहेत. उत्पन्नाचे दुसरे साधन नसलेल्या कलाकरांना हा लाभ दिला जातो. राज्यातील जिल्हा पातळीवर या कलाकरांच्या अर्जाची छाननी केली जाते. आर्थिक मदतीची रक्कम वाढल्यानंतर गेल्या दोन वर्षात लाभ घेणाऱ्या कलाकारांची संख्या वाढली आहे. ती आता ३४ हजाराच्या घरात गेली आहे. प्रत्येक जिल्हानिहाय १०० कलाकारांचे अर्ज मागवण्यात आलेले आहेत. या मदतीसाठी सरकारने या वर्षी २२५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याशिवाय शासनाने जिल्ह्यातील जेष्ठ कलाकारांसाठी १०० अर्जांची मर्यादा ठेवली आहे. राज्यातील कानाकोपऱ्यातून या मदतीसाठी अर्ज येत असतात. काही कलाकारांचे निधन होत असल्याने ही संख्या कमी होते पण नवीन येणारे अर्जांची संख्या दरवर्षी वाढत असल्याचे एका उच्च अधिकाऱ्याने सांगितले.





# अन् 'बॉम्ब' ...ती मॉकड्रील

▸विदर्भ केसरी। यवतमाळ

गुरुवार सकाळी ९.२५ ते १०ची वेळ. बसस्थानकातच प्रवाशांची वर्दळ. अशातच अज्ञात व्यक्तीने घातपात करण्याच्या उद्देशाने बॉम्ब असलेली बॅग ठेवली आहे. अशी माहिती पोलिस नियंत्रण कक्ष येथे मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र अनेक प्रवाशांना काय आहे? पोलिस नेमके कशासाठी आले? असे अनेक कुतूहल निर्माण करणारे प्रश्न पडले. चिकित्सा वाढली. नेमके काय सुरू आहे. जो तो बॉम्बची चर्चा करु लागला. दरम्यान पोलिस विभागातर्फेच मेगा फोनद्वारे एक मॉकड्रील (रंगीत तालीम) असल्याचे सांगण्यात आल्याने अन् अनेक नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला.

युध्दाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्हा पोलीस दलाच्या वतीने बसस्थानक, यवतमाळ येथे बॉम्ब कॉलची रंगीत तालीम घेण्यात आली. सदर तालीमेच्या अनुषंगाने येथील बस स्थानकाच्या वाहन पार्किंगमध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने घातपात करण्याच्या उद्देशाने बॉम्ब असलेली बॅग ठेवली आहे अशी माहीती पोलीसांना मिळताच पोलीस यंत्रणा तातडीने घटनास्थळी पोहचुन कोणतीही जिवित अथवा वित्त हानी होवू न देता बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच श्वान पथकाव्दारे संपूर्ण घटनास्थळाची घातपातविरोधी तपासणी करण्यात आली आणि सदर बॉम्ब असलेल्या बॅगला बस स्थानकासमोरील निर्मनुष्य केलेल्या ठिकाणी नेऊन सदर बॉम्ब डिफ्युज होणारा नसल्याने संशयीत बॅग, बॉम्ब शोधकच नाशकः पथकाने रिमोटली कॅरी करुन BDDS कॅनमध्ये असलेल्या बॉम्ब बास्केटमध्ये ठेवुन निर्मानुष्य व गावाच्या बाहेर असलेल्या जागेवर डिफ्युज करण्यात आला, त्यानंतर फॉरेन्सीक टिमच्या मार्फतीने घटनास्थळावरील भौतीक पुरावे जप्त करण्यात आले. सदर घटने दरम्यान थांबवून ठेवलेली रस्त्यावरील गर्दी ही ट्राफिक पोलीसांच्या मदतीने सुरळीत करण्यात आली




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
शुक्रवार, १० एप्रिल २०२६ | ३

GOOD MORNING
## कॉटनसिटी
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

### शेळ्या नेल्या म्हणून इसमाला मारहाण
**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

शेतातून शेळ्या नेल्याच्या कारणावरुन एका ५५ वर्षीय इसमाला तिघांनी बेदम मारहाण केली. ही घटना आर्णी तालुक्यातील दाभडी शिवारात ८ एप्रिल रोजी दुपारी घडली. बलराम भगवती प्रसाद भवनपुरी (५५) रा. दाभडी ता. आर्णी असे मारहाण झालेल्या इसमाचे नाव आहे. त्यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरुन आर्णी पोलिसांनी राजू रामराव ठक (२०), गजानन रामराव ठक (२५) आणि अविनाश शामराव ठक (१९) सर्व रा. दाभडी यांच्याविरुद्धा गुन्हे दाखल केले.

**महत्त्वाचे**




### नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करा : बहुजन मुक्ती पार्टीची मागणी.
**▸विदर्भ केसरी। दारव्हा (प्रतिनिधी):-**

तालुक्यात अंदाजे छहांशी (86) ग्रामपंचायती असून प्रत्येक नागरिकांना विविध कार्यालय जसे की, तहसील कार्यालयातील उपविभागीय कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय,सेतू,आधार उपडेट,दुय्यम निबंधक कार्यालयात विविध कामाकरिता नागरिकांना तहसील कार्यालयात यावे लागते.सध्या उन्हाळ्याचे दिवस व त्यामध्ये ही एप्रिल महिना सुरु असून तहसील कार्यालयात कार्यालयीन कामासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कुठेही दिसून येत नाही.त्यामुळे शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था त्वरित करण्यात यावी.अशी मागणी बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने बिमोद मुधाने बहुजन मुक्ती पार्टी लोकसभा अध्यक्ष यवतमाळ/ वाशीम यांनी केली आहे

# प्रकल्पासाठी शेततळ्यांचा मार्ग अडवला?
## बोर्टामध्ये शेतकऱ्यांचा संताप; १५ एप्रिलपासून आमरण उपोषणाचा इशारा



**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

मुख्यमंत्री कृषी सौर वाहिनी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे बोर्टा परिसरातील शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यावर गदा येत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. संबंधित मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीकडून शेतकऱ्यांचा सरकारी रस्ता बंद करून, शेततळ्यांमधून शेतकऱ्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी अडथळे निर्माण करण्याचा प्रस्ताव राबविण्यात येत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या प्रकरणी सरपंच पंकज ओंकार सावळे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला आहे. अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे, ई-ग्लास जमिनी गट क्र. ९९ व १०६ येथील प्रकल्पासाठी कंपनीने संबंधित गावकऱ्यांना विश्वासात न घेता व कोणतीही अधिकृत मोजणी न करता बेकायदेशीर कामे सुरू केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**■ तक्रारीतील मुख्य मुद्दे :**

☐ शेतकऱ्यांचा पारंपरिक रस्ता बंद करण्याचा प्रयत्न

☐ शेततळ्यांमधील पाण्याचा औद्योगिक वापरासाठी वळवण्याचा प्रस्ताव

☐ गावकऱ्यांची परवानगी व विश्वास न घेता कामांची सुरुवात

☐ प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष

यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी अखेर आक्रमक पवित्रा घेत उपविभागीय कार्यालय, मूर्तिजापूर येथे १५ एप्रिल २०२६ पासून आमरण बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

या निवेदनाच्या प्रतिलिपी खा .अनुप धोत्रे, आ. हरीश पिंपळे, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणेदार शहर पोलीस स्टेशन, मूर्तिजापूर , ठाणेदार माना पोलीस स्टेशन यांना सादर करण्यात आल्या आहे.

**■ "शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यावर कुठलाही अन्याय सहन केला जाणार नाही. प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून कंपनीवर कारवाई करावी, अन्यथा १५ एप्रिल पासून आमरण उपोषण हाच आमचा शेवटचा पर्याय असेल,"**
**- पंकज सावळे ,सरपंच बोर्टा**

### प्रशासनाची कसोटी

**■ या गंभीर प्रकरणामुळे आता प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार असून, शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे तातडीने लक्ष देऊन तोडगा काढला जातो की आंदोलन पेट घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

**■ बोर्टा येथील सरपंच व ग्रामस्थांनी सौर ऊर्जा प्रकल्पामुळे शेतरस्त्याबाबत तक्रार मांडली .या विषयी उपविभागीय अधिकाऱ्यांना काम बंद करून भूमी अभिलेख विभाग मार्फत मोजणी करुन रितसर काम करण्याची सूचना केली.**
**- हरीश पिंपळे आमदार , मूर्तिजापूर**

**■ बोर्टा येथील सौर ऊर्जा प्रकरणा बाबत निवेदन प्राप्त झाले असून याविषयी नायब तहसीलदार यांना घटनास्थळी पाहणी करुन चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहे.**
**- संदीपकुमार अपार उपविभागीय अधिकारी ,मूर्तिजापूर**

## महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त स्वच्छता व रस्ते दुरुस्तीची मागणी



**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

येत्या ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती तसेच १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे.या पार्श्वभूमीवर शहरात स्वच्छता व रस्ते दुरुस्ती करण्याची मागणी शेतकरी चळवळ,यवतमाळ यांच्या वतीने करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही यवतमाळ शहरात मोठ्या प्रमाणावर रॅली,मिरवणुका व विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.मात्र,शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांची अवस्था खराब असल्याने नागरिकांना व मिरवणूक काढणाऱ्या कार्यकर्त्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो.तसेच शहरातील बौद्ध विहार परिसर व दलित वस्त्यांमध्ये स्वच्छतेचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे. या सर्व बाबींचा विचार करून शेतकरी चळवळीच्या वतीने यवतमाळ नगर परिषद प्रशासनाकडे विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

यामध्ये जयंतीपूर्व किमान एक आठवडा विशेष स्वच्छता मोहीम राबविणे,रॅली मार्गावरील रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करणे,बौद्ध विहार परिसर व दलित वस्त्यांमध्ये स्वच्छता करणे,तसेच फायर सर्व्हिसच्या माध्यमातून परिसर धुऊन स्वच्छ करणे यांचा समावेश आहे. वरील मागण्यांसंदर्भात शेतकरी चळवळ,यवतमाळ यांच्या वतीने यवतमाळ नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांच्या माध्यमातून मुख्याधिकारी व नगराध्यक्षा यांना आज दिनांक ९ एप्रिल (गुरुवार) रोजी निवेदन सादर करण्यात आले. दरम्यान,निवेदन सादर करताना नगरसेवक आनंद गायकवाड,कॉम्रेड सचिन मनवर,प्रा.पंढरी पाठे,निशांत उर्फ गट्टू भगत व अनुज गणवीर उपस्थिती होते. या मागण्यांची तात्काळ दखल घेऊन प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी,अशी नागरिकांकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# एका महिला पदाधिकाऱ्या वर कारवाईची प्रक्रिया सुरू
## एसएसडब्ल्यूएफ संस्थेची बदनामी प्रकरण: खोटी माहिती प्रसारित केल्याचा आरोप; नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर :**

सामाजिक कार्यात पारदर्शकतेचा दावा करणाऱ्या सामाजिक सेवा वेल्फेअर फाउंडेशन या संस्थेच्या नावाची बदनामी केल्याप्रकरणी एका महिलेविरुद्ध संस्थेकडून कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

संस्थेच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनानुसार,एसएसडब्ल्यू एफ ही संस्था पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने समाजहितासाठी कार्यरत असून, संस्थेकडून केवळ २५० अधिकृत सभासद शुल्क घेतले जाते. कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर आर्थिक व्यवहार संस्थेमार्फत होत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, महिलेची ऑक्टोबर महिन्यात बाळापूर तालुका महिला अध्यक्ष म्हणून तात्पुरती नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, पाच महिन्यांच्या कालावधीत त्यांना देण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अपयश आल्याचे संस्थेने म्हटले आहे. १० विभाग प्रमुख व १०० केंद्र प्रमुख नियुक्त करण्याचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्याने तसेच काही केंद्र प्रमुखांकडून रक्कम गोळा करून ती नियमानुसार न वापरल्याचा आरोपही संस्थेने केला आहे. या पार्श्वभूमीवर संस्थेच्या नियमांनुसार संबंधित महिलेची नियुक्ती तत्काळ रद्द करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून संस्थेचे कार्य सुरळीत सुरू करण्यात आले असून, अनेक महिलांनी पुन्हा संस्थेसोबत काम करण्यास उत्सुकता दर्शविल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, ३१ मार्च रोजी आयोजित पत्रकार परिषद व अकोला जिल्हा उद्घाटन सोहळा हाणून पाडण्याच्या उद्देशाने ३० मार्च रोजी चुकीची बातमी प्रकाशित केल्याचा आरोप संस्थेकडून करण्यात आला आहे. मात्र, या बातमीचा कोणताही परिणाम न होता कार्यक्रमाला ५ हजारांहून अधिक नागरिकांनी उपस्थिती लावल्याचेही नमूद करण्यात आले

### संस्थेची स्पष्ट भूमिका; बदनामीविरोधात कठोर पावले उचलणार

**■ एसएसडब्ल्यूएफ संस्थेने स्पष्ट केले आहे की, संस्थेच्या नावाची बदनामी करणे, खोटी माहिती प्रसारित करणे व आर्थिक व्यवहार करणे हे गंभीर गुन्हे असून, अशा प्रकरणांमध्ये संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.**

### नागरिकांना आवाहन

**■ संस्थेच्या वतीने नागरिकांना संबंधित महिलेपासून सावध राहण्याचे, एसएसडब्ल्यूएफच्या नावावर कोणताही आर्थिक व्यवहार न करण्याचे तसेच कोणतीही शंका असल्यास थेट संस्थेशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

# जिल्हाध्यक्षपदी अरुण भाविक यांची निवड

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ | प्रतिनिधी**




केंद्रीय मानव अधिकार सुरक्षा संघटन, दिल्ली यांच्या यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी अरुण बन्सीलाल भाविक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही निवड राष्ट्रीय अध्यक्ष तेजकरण चव्हाण यांच्या आदेशानुसार, महाराष्ट्र राज्य सचिव रवींद्र खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विदर्भ अध्यक्ष अभय व्यास यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या नियुक्तीला विदर्भ उपाध्यक्ष देवेंद्र पुनकर, विदर्भ सचिव अनिल गुप्ता आणि विदर्भ संघटक प्रमुख प्रभाकरराव कुलट यांची सहमती मिळाली आहे. या निवडीमुळे अरुण भाविक यांच्यावर यवतमाळ जिल्ह्यात संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. अरुण भाविक हे एक सक्रिय आणि जिद्दी सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सातत्यपूर्ण सहभाग असून अनेक संस्थांचे पाठबळ त्यांना लाभले आहे. त्यांच्या निवडीमुळे यवतमाळ जिल्ह्यात मानव अधिकार विषयक कार्याला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य सचिव रवींद्र खेडकर, विदर्भ अध्यक्ष अभय व्यास, विदर्भ उपाध्यक्ष देवेंद्र पुनकर, विदर्भ सचिव अनिल गुप्ता, विदर्भ संघटक प्रमुख प्रभाकरराव कुलट, यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष सचिन अडसळ, शितल भाजीवाले, सहकोषाध्यक्ष अरुण भाविक, जिल्हाध्यक्ष संजय भुरे, जिल्हा कोषाध्यक्ष केतकी भाविक तसेच सहसचिव आणि अकोला जिल्हा टीमच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. याशिवाय, विदर्भ उपाध्यक्ष व सिटी इंडिया मराठी न्यूजचे उपसंपादक देवेंद्र पुनकर (सावरा, मंचनपूर) यांनीही अरुण भाविक यांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गोल्ड मेडललिस्ट साक्षी बुरकुलेचा सत्कार

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी**
**विजय निखाते**




पुसद: पुसदच्या इतिहासात गोल्ड मेडल मिळवून मानाचे स्थान मिळविणारी साक्षी सर्वसामान्य परिस्थिती असताना सुद्धा जिद्दीने व मेहनतीने तिन्हे यश मिळविले केंद्र सरकारतर्फे आयोजित रायपूर (छत्तीसगड) येथे पार पडलेल्या पहिल्या ट्रायबल खेलो इंडिया स्पर्धेत ८२ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकवणारी विद्यार्थीनी कु.साक्षी बंडू बुरकुले हिचा माणुसकीची भिंत मदत केंद्र उपजिल्हा रुग्णालय पुसद येथे माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन पुसद ,मिशन ग्रीन,वसुंधरा बहुउद्देशीय संस्था यांच्याकडून सन्मानचिन्ह व वृक्ष रोपटे देऊन सत्कार करण्यात आला .तसेच उपस्थित मान्यवर शरद पाटील व अनिकेत पाटील यांच्या हस्ते खेलो इंडिया 2025 मध्ये कास्य पदक प्राप्त कु. पूजा संजय ढेपेकर व राज्यस्तरीय रोप्य पदक प्राप्त पियुष आढावे यांचा सुद्धा सन्मानचिन्ह व वृक्ष रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. साक्षी बुरकुले हिचा अभिमान पुसदवासीयांना आहे.तिने पुसद शहराचे नाव रोशन केले तिच्या या विजयाचे पुसद शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळेस शरद शेषराव पाटील,राजेश्वर पाटील,अनिल पाटील,अनिकेत पाटील,श्याम पाटील माणुसकीच्या भिंतीचे अध्यक्ष गजानन जाधव, मिशन ग्रीन चे अध्यक्ष रमेश डबोळे, मंगेश भगत,संतोष गावंडे मधुकर चव्हाण,दिगंबर देशमुख,सोनू पाटील,अरुण नागुलकर ,धनंजय आघाम,मुरलीधर ढगे,प्रमोद ठाकूर,दादाराव पाईकराव,दीपक घाडगे,आदित्य जाधव,अमित हटवार,नितीन चव्हाण व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन आरोपींकडून ११२.०९ कि.ग्रॅ. गांजा जप्त!

**▸विदर्भ केसरी। बाळापूर**



पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली "ऑपरेशन प्रहार" अंतर्गत दिनांक ०८/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांचे पथकाला गोपनीय माहिती प्राप्त झाली बेलदारपुरा परिसरात काही व्यक्ती त्यांच्या ताब्यातील वाहनांमध्ये मोठ्या प्रमाणात गांजा साठवनुक करीत आहे. मिळालेल्या माहिती वरून सदरची माहिती वरिष्ठांना देऊन तसेच ठानेदार प्रकाश झोडगे यांचे सोबत समन्वय साधून संयुक्तरीत्या छापा टाकण्याचे नियोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने कायदेशीर बाबी ची पूर्तता करून सदर ठिकाणी पोहोचून आरोपींच्या घरासमोर पोलीस पथकाने पाहणी केली असता एक ट्रक व एक पांढऱ्या रंगाची फॉर्च्यूनर कार उभी असल्याचे दिसून आले. संबंधित वाहनांबाबत चौकशी केली असता ती वाहने आरोपी वापरत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर पंच व राजपत्रित अधिकारी यांच्या उपस्थितीत दोन्ही वाहनांची झडती घेण्यात आली. झडतीदरम्यान फॉर्च्यूनर कार क्र. MH-05-BA-1010 मध्ये मागील बाजूस एक पांढऱ्या रंगाच्या पोत्यामध्ये ओलसर हिरवट रंगाचा गांजा सदृश्य अंमली पदार्थ आढळून आला. तसेच ट्रक क्र. MH-30-BD-3130 च्या केबिनमध्ये दोन पांढऱ्या रंगाच्या पोतड्या आढळून आल्या. फॉर्च्यूनर कार व ट्रक अशा दोन्ही वाहना मधून एकूण ११२.०९ कि.ग्रॅ. गांजा जप्त करण्यात आला. सदर गांजाची अंदाजे बाजार किंमत प्रति किलो ₹२३,०००/- प्रमाणे ₹२५,७८,०५७/- इतकी आहे. तसेच गांजा वाहतूक करण्यासाठी वापरलेलीट्रक क्र. MH-30-BD-3130 (किंमत अंदाजे ₹ २०,००,०००/-) फॉर्च्यूनर कार क्र. MH-05-BA-1010 (किंमत अंदाजे ₹ १०,००,०००/-) अशी एकूण ₹ ५५,७८,०५७/- किंमतीचा मुद्देमाल पंच व राजपत्रित अधिकारी यांच्या उपस्थितीत जप्त करून सीलबंद करण्यात आला. सदर प्रकरणी आरोपी नामे मोहम्मद असलम मो. आजम, वय ४९ वर्षे, रा. बेलदारपुरा, बाळापूर, मोहम्मद अजमल मो. आजम, वय ४२ वर्षे, रा. बेलदारपुरा, बाळापूर यांनी संगनमताने स्वतःचा आर्थिक फायदा मिळविण्याच्या उद्देशाने अवैधरित्या गांजा साठवून विक्री करण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायदा (NDPS Act) कलम ८, २० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रकाश झोडगे पोलिस उपनिरीक्षक गोपाल जाधव, पोलिस उपनिरीक्षक नयन पाटील, पोलिस उपनिरीक्षक शरद सैदाने, पोलिस उपनिरीक्षक संभाजी हिवाळे. पोलिस उपनिरीक्षक माधुरी पाटील. हेड कॉन्स्टेबल शेख हसन, रवि खंडारे, महेंद्र मलिये, किशोर सोनोने, मो. एजाज, शेख, वसीमोद्दीन, अ. माजिद, श्रीकांत पातोंड, अशोक सोनोने, व चालक मनिष ठाकरे तसेच अंकुश मोरे, सोहेल खान, शुभम गई, संदीप पेड, सुरेश भारसाकळे, मोहन ढाकरे पोलीस स्टेशन बाळापुर येथील पोलीस कर्मचारी यांनी केली.

# यवतमाळ पालिकेचा गरिबांच्या पोटावर पाय
## नगराध्यक्षांना 'रील्स'ची हौस, सुशिक्षित बेरोजगारांचे संसार उघड्यावर!

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ/**



केंद्रातील मोदी सरकारच्या नाकर्तेपणामुळे आज देशात बेरोजगारीचा आकडा ऐतिहासिक पातळीवर पोहोचला आहे. केंद्र सरकार रोजगाराच्या बाबतीत कोणतेही ठोस पावले उचलण्यास अपयशी ठरल्याने, आजचा सुशिक्षित तरुण आपला आणि आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी रस्त्याच्या कडेला छोटे-मोठे व्यवसाय करून प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, यवतमाळ नगरपरिषदेच्या नवनियुक्त नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके या केवळ स्वतःच्या ब्रँडिंगसाठी आणि इंस्टाग्रामवर 'रील्स' बनवण्यासाठी कंटेंट मिळावा म्हणून या गरिबांच्या रोजगारावर अतिक्रमणाचा हातोडा चालवत आहेत, असा घणाघाती आरोप काँग्रेस सोशल मीडिया सेलचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके यांनी केला आहे.

नगरपरिषद प्रशासनाच्या या अमानुष कारवाईमुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. वास्तविक पाहता, प्रशासनाकडे शहराच्या विकासाची कोणतीही उत्कृष्ट कार्यपद्धती नाही, केवळ सोशल मीडियावर चमकण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया करून सामान्यांना वेठीस धरले जात आहे. हाताला काम नसल्याने कष्टाने चार पैसे कमवणाऱ्या या तरुणांना आधार देण्याऐवजी, त्यांचे व्यवसाय उद्ध्वस्त करून नगराध्यक्षा नेमके काय साध्य करत आहेत, असा संतप्त सवाल पुसनाके यांनी उपस्थित केला आहे.

### ती कारवाई त्वरीत थांबविण्याची मागणी

**■ या गंभीर परिस्थितीची दखल घेत कृष्णा पुसनाके यांनी मागणी केली आहे की, नगरपरिषद प्रशासनाने या सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार करण्यासाठी अत्यंत कमी दरामध्ये व्यावसायिक गाड्या उपलब्ध करून द्याव्यात किंवा त्यांना व्यवसाय करण्यासाठी हक्काची पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी. जोपर्यंत अशा प्रकारची कोणतीही ठोस उपाययोजना होत नाही, तोपर्यंत प्रशासनाने गरिबांच्या पोटावर पाय देणारी ही कारवाई त्वरित थांबवावी. जर प्रशासनाने या तरुणांना सन्मानाने जगण्यासाठी जागा दिली नाही, तर काँग्रेस सोशल मीडिया सेलच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. आता या आक्रमक पवित्र्यानंतर नगरपरिषद प्रशासन या सुशिक्षित बेरोजगारांना दिलासा देणार की केवळ 'रील्स'च्या नादात गरिबांचे संसार उधळून लावणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

# रिसोडचा बळीराजा सुळावर! सहा वर्षांत ५० शेतकऱ्यांनी संपविली जीवनयात्रा

**▸विदर्भ केसरी। प्रदिप खंडारे**



**रिसोड-** एकीकडे 'डिजिटल इंडिया'च्या गप्पा मारल्या जात असतानाच,वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात मात्र विदारक चित्र समोर आले आहे.गेल्या सहा वर्षांच्या कालावधीत तब्बल ५० शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणा आणि सततच्या नापिकीला कंटाळून आपली जीवनयात्रा संपविली आहे.अन्नदात्याच्या या सामूहिक आत्महत्यांनी जिल्हा हादरला असून, प्रशासकीय यंत्रणेच्या संवेदन शून्यतेवर आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २०२०-पासून ते आज तागायत तालुक्यात आत्महत्येचे सत्र सुरूच आहे.कधी ओला दुष्काळ,तर कधी कोरड्या दुष्काळाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला.बँकेचे कर्ज आणि खाजगी सावकारांचा तगादा या दुहेरी कात्रीत अडकलेला शेतकरी अखेर टोकाचे पाऊल उचलताना दिसत आहे. मृत शेतकऱ्यांमध्ये तरुणांचे प्रमाण अधिक असणे, ही चिंतेची बाब ठरत आहे. शेतकरी आत्महत्या केल्यानंतर प्रशासनाकडून पंचनामे केले जातात. मात्र, तालुक्यातील ५० कुटुंबांचा आधार हरपला आहे. या भयावह आकड्या नंतरही लोकप्रतिनिधी आणि प्रशासन केवळ बैठकांमध्येच व्यस्त असल्याचे दिसते.शेतमालाला हमीभाव मिळत नाही,तोपर्यंत हा मृत्यूचा आकडा थांबणार नाही,असे स्पष्ट मत शेतकरी संघटनांनी व्यक्त केले आहे. आता या संदर्भात शासन स्तरावर काही गंभीर पावले उचलली जातात की केवळ आकडेवारीच्या खेळात बळीराजाचा जीव जात राहणार,हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## मोबाईल टॉवरचे साहित्य लंपास

**विदर्भ केसरी। यवतमाळ** बीएसएनएलच्या मोबाईल टॉवरचे १६ हजारांचे साहित्य अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना दिग्रस तालुक्यातील मांडवा या गावात उघडकीस आली आहे. या चोरीमुळे परिसरातील नेटवर्कवर विपरित परिणाम झाला. टॉवर बंद पडल्याची माहिती मिळताच बीएसएनएलच्या कनिष्ठ अभियंता मोनिका प्रमोदराव बरगट (३५) रा. हरीहर पेठ अकोला यांनी तातडीने मांडवा येथे धाव घेत पाहणी केली. त्यावेळी टीआरई आणि कबाईनर हे साहित्य चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. त्यावरुन कनिष्ठ अभियंता बरगट यांनी तातडीने दिग्रस पोलिस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली. त्यावरुन पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे.

# सामाजिक परिवर्तनाच्या नृत्यांनी गाजला समता पर्वाचा दुसरा दिवस!

## कथक, योगा, लेझीम, सोलो डान्स व सामूहिक वृत्तांनी वयाचे भान विसरले स्पर्धक

**विदर्भ केसरी। यवतमाळ**




महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता पर्व प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित समता पर्व 2026 अंतर्गत दुसरा दिवस महिलांच्या नृत्य स्पर्धेने अक्षरशः रंगून गेला. दिनांक 7 एप्रिल ते 14 एप्रिल दरम्यान सुरू असलेल्या या भव्य उपक्रमात दुसऱ्या दिवशी सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या विविध नृत्य प्रकारांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

कथक, योगा, लेझीम, सोलो डान्स तसेच सामूहिक सादरीकरणांच्या माध्यमातून स्पर्धकांनी कला आणि समाजप्रबोधन यांचा सुंदर संगम घडवून आणला. विशेष म्हणजे, या स्पर्धेत 14 वर्षांपासून ते 80 वर्षांपर्यंतच्या स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वयाची मर्यादा ओलांडली आणि "कला हीच खरी ओळख" याची प्रचिती दिली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रसिद्ध समाजसेविका सिंधूताई सपकाळ यांच्या जीवनावर आधारित एकपात्री प्रयोगाने झाली, ज्याने उपस्थितांना भावनिक आणि प्रेरणादायी संदेश दिला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून प्रमोदिनी रामटेके यांनी जबाबदारी सांभाळली, तर उद्घाटक म्हणून हेमलता वैद्य उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून मंजुषा बोरगमवार, सोनाली रामटेके, गंगा रंगारी, माधुरी वाळके, पुष्पा कावळे, प्रा. प्रिया वाकडे, नंदिनी शहारे, ज्योती जीवने, पल्लवी कांबळे, शुभांगी मालखेडे, मनिषा डोंगरे, वृंदा कांबळे, सायली गुरदे, कुसुम देवतळे, वनमाला वंजारी, मिरा वीर, प्रतिभा दातार, जोसना गौरकार, विशाखा डोगरे व देवांगना मेश्राम यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. वैशाली हिरे यांनी केले, भूमिका सुनीता कापशीकर यांनी मांडली, तर सूत्रसंचालन कुशल रंगारी यांनी प्रभावीपणे केले. आभार प्रदर्शन रेखा गुजर यांनी केले.

या यशस्वी आयोजनासाठी वृंदा उके, भागीरथी गुरदे, विनीता राऊत, भाविका रामटेके, समता दुपारे, हर्षा बोडखे, कांचन जुमनाके, नंदा वाकोडे, सुनीता पोपटकर आणि विशाखा लिहीतकर यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. वीरा मांडवकर, अमित राऊत आणि ॲड. वैशाली हिरे यांनी केले. समता पर्वाचा हा दुसरा दिवस सामाजिक संदेश, कला आणि उत्साह यांचा संगम ठरत, उपस्थित हजारो प्रेक्षकांच्या मनावर कायमची छाप सोडून गेला.

### महत्त्वाचे



## गॅसटंचाई बाबत वंचित बहुजन आघाडीचे तहसीलदार यांना निवेदन

**विदर्भ केसरी। कळंब तालुका प्रति :-विरेंद्र चव्हाण**

कळंब : राज्यभरात गॅसटंचाई निर्माण झाल्याने नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. काही ठिकाणी गॅसचा काळाबाजार केला जात आहे. त्यामुळे शासनाने गॅसटंचाई दूर करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. यासाठी निवासी ना.तहसीलदार अनंत बकाले यांना निवेदन सादर करण्यात आले.
गॅसटंचाईमुळे हॉटेल व्यवसाय रोजगार गेला आहे. केटरिंगचा व्यवसाय ठप्प पडला आहे. महाराष्ट्रातील हजारो छोट्या व्यावसायिकांना दुकाने बंद करावी लागली आहेत. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीने 'नरेंदर, कब मिलेगा सिलिंडर' या आंदोलनातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष मधुकर कांबळे, बंडू भाले, अहिंसक भगत, मिलिंद कांबळे, विजय पाटील, विश्वास धवने, हंसराज झपाटे, सुधाकर ठोंबरे, शितल बुरबुरे आदींच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले

## अवैध बांधकामांवर बुलडोजर

**विदर्भ केसरी।**



मुंबईतील मलाड पूर्व भागातील दिंडोशी परिसरात घडलेल्या दंगलप्रकरणी प्रशासनाने कठोर भूमिका घेत मोठी कारवाई केली आहे. संतोष नगर परिसरात झालेल्या या हिंसाचारानंतर संबंधित आरोपींच्या अवैध बांधकामांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून बुलडोजर चालवण्यात आला. या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला होता, मात्र पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तामुळे परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात आली आहे. या प्रकरणात आतापर्यंत 11 जणांना अटक करण्यात आली असून, त्यामध्ये काही महिला आणि अल्पवयीनांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.
ही दंगल 5 एप्रिलच्या रात्री संतोष नगरमध्ये देवी मरियम्मा पूजेसाठी निघालेल्या त्रिशूल यात्रेदरम्यान घडली होती. लाउडस्पीकरवर भजन लावण्यावरून दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला. या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले आणि त्यानंतर दोन समुदायांमध्ये हिंसक झटापट सुरू झाली. काही वेळातच परिस्थिती गंभीर बनली आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. तपासादरम्यान या प्रकरणात आणखी धक्कादायक माहिती उघड झाली आहे. दंगल भडकवणाऱ्या शेख कुटुंबाचा ड्रग्सच्या अवैध व्यापाराशी संबंध असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी घराची झडती घेतली असता तेथून ड्रग्सचे पॅकेट्स जप्त करण्यात आले. स्थानिक नागरिकांच्या मते, हे कुटुंब बराच काळ परिसरात दहशत निर्माण करत होते. त्यांनी बेकायदेशीरपणे तीन मजली इमारत उभारून त्यावर मोबाईल टॉवरही बसवला होता. दंगलीनंतर महानगरपालिकेने या अवैध बांधकामांबाबत नोटीस बजावली होती. 24 तासांचा कालावधी देऊनही समाधानकारक उत्तर न मिळाल्याने गुरुवारी प्रशासनाने थेट कारवाई करत बुलडोजरच्या सहाय्याने हे बांधकाम पाडले. या मोहिमेत मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई शांततेत पार पडली. या कारवाईदरम्यान प्रमुख आरोपी सोहेल शेख, शब्बू शेख, फिरोज शेख आणि मुनीर शेख यांच्यासह एकूण 11 जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्यात आली. मात्र काही स्थानिकांनी आरोप केला की, मुख्य आरोपी घटनास्थळावरून पसार झाले असून पोलिसांनी काही निरपराधांवरही कारवाई केली. या आरोपांचीही चौकशी केली जात आहे.

## तरुणाचा आढळला मृतदेह

**विदर्भ केसरी। अहेरी:**

तालुक्यातील इंदाराम येथील एका तरुणाचा मृतदेह महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवर असलेल्या सिपेली गावालगत ८ एप्रिल रोजी संशयास्पद स्थितीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

कुणाल बाबुराव औतकर (२५) असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याच्या मृत्यूचे गूढ वाढले आहे. तो पोलिस भरतीची तयारी करत होता, मात्र अचानक मृत्यू झाल्याने हे स्वप्न अधुरे राहिले.कुणाल औतकर हा ७ एप्रिल रोजी तरुण नागेश तोरे या मित्राची दुचाकी (एमएच ३३ एके-१८६३) घेऊन तेलंगणाला गेला होता. ८ एप्रिल रोजी तेलंगणातील सिपेली गावच्या शिवारात त्याचा मृतदेह आढळून आला. एका निर्जन ठिकाणी मृतदेह पाहून परिसरात भीतीचे वातावरण पसरले. स्थानिक नागरिकांनी तातडीने याची माहिती पोलिसांना दिली. मृतदेहाची उत्तरीय तपासणी तेलंगणा राज्यातील मानेपल्ली येथे केली. त्यानंतर मृतदेह इंदाराम येथे पाठविण्यात आला. कुणालचा मृतदेह ज्या स्थितीत सापडला, त्यावरून हा केवळ अपघात नसून घातपात असावा, असा संशय मृताच्या नातेवाईकांनी आणि गावकऱ्यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या सीमेवर हा प्रकार घडल्याने दोन्ही राज्यांच्या पोलिसांसमोर तपासाचे आव्हान उभे ठाकले आहे. घटनेची माहिती मिळताच तेलंगणा पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविला आहे. हा घातपात आहे की घातपाताचा बनाव रचलेला अपघात, याचा शोध आता पोलिस घेत आहेत. या धक्कादायक घटनेमुळे इंदाराम परिसरात शोककळा पसरली असून, कुणालच्या मृत्यूचे सत्य समोर यावे, अशी मागणी होत आहे.

## यवतमाळात आयपीएल सट्ट्यावर धाड

### एक आरोपीसह ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ केसरी। यवतमाळ**



यवतमाळ शहरात सुरू असलेल्या आयपीएल सामन्यांवर ऑनलाईन सट्टा चालविणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेऊन सुमारे ५०,५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दि. ८ एप्रिल २०२६ रोजी यवतमाळ उपविभागात जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार रोशन गोपाल पुरोहित हा इसम कॉटन मार्केट समोरील आपल्या राहत्या घरात आयपीएल सिझनमधील दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध गुजरात टायटन्स या सामन्यावर मोबाईल व मॉनिटरच्या माध्यमातून ऑनलाईन सट्टा चालवत असल्याचे निष्पन्न झाले.

वरिष्ठांच्या आदेशानुसार पथकाने पंचांसमक्ष घटनास्थळी छापा टाकला असता, आरोपी मोबाईलद्वारे संभाषण करत पैशांची बाजी लावून हार-जीतचा जुगार खेळविताना रंगेहाथ सापडला. यावेळी त्याच्याकडून ऑनलाईन सट्टा खेळण्यासाठी वापरण्यात येणारे ४ अँड्रॉईड मोबाईल, १ डेल कंपनीचा मॉनिटर, १ कीबोर्ड असा एकूण ४६,५५० रुपयांचा साहित्य तसेच अंगझडतीत ४,००० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. एकूण ५०,५५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवून पुढील कारवाईसाठी त्याला यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात सुपूर्द करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. या पथकात सपोनि मनिष गावंडे, पोउपनि गजानन राजमलू, रफीक/सय्यद साजीद, योगेश गटलेवार, अजय डोळे, प्रशांत हेडाड, रूपेश पाली, योगेश डगवार, सुनील पैठणे, देवेंद्र होले, आकाश सूर्यवंशी यांचा समावेश होता.

शहरात वाढत्या ऑनलाईन सट्ट्याच्या प्रकारांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारल्याने अशा बेकायदेशीर व्यवसायांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयात "वन हेल्थ दृष्टिकोन" विषयावर द्वितीय राष्ट्रीय पशुवैद्यकीय, मत्स्य व दुग्ध संगोष्ठी 2026 चे आयोजन

**विदर्भ केसरी। सतीश भालेराव**




**नागपूर** भारताच्या कृषी व संलग्न क्षेत्रांना बळकटी देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत या ॲग्रिविसन द्वारे Maharashtra Animal and Fisheries Sciences University (MAFSU), नागपूर, Veterinary Council of India, नवी दिल्ली आणि विद्यानिधी, नागपूर यांच्या सहकार्याने "द्वितीय राष्ट्रीय पशुवैद्यकीय, मत्स्य व दुग्ध संगोष्ठी 2026" चे आयोजन 11 व 12 एप्रिल 2026 रोजी Nagpur Veterinary College (NVC) परिसर, सेमिनरी हिल्स, नागपूर येथे करण्यात आले आहे. या संगोष्ठीचा मुख्य विषय आहे "समाकलित वन हेल्थ दृष्टिकोनः ग्रामीण सक्षमीकरणासाठी पशुवैद्यकीय, दुग्ध व मत्स्य क्षेत्रांची मजबुती." या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात देशभरातील सुमारे 400 विविध घटकांचा सहभाग अपेक्षित आहे, ज्यामध्ये शास्त्रज्ञ, प्राध्यापक, धोरणनिर्माते, उद्योगतज्ज्ञ, पशुवैद्यक, दुग्ध व मत्स्य क्षेत्रातील व्यावसायिक, उद्योजक, संशोधक आणि विशेषतः विद्यार्थी यांचा समावेश असेल. भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे ग्रामीण उपजीविका, पोषण सुरक्षा आणि आर्थिक विकासासाठी पशुधन, दुग्ध आणि मत्स्य क्षेत्रांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. मात्र, या क्षेत्रांना वाढत्या झूनोटिक रोगांचा धोका, हवामान बदलाचे परिणाम, पर्यावरणीय हानी आणि शाश्वत उत्पादन प्रणालींची गरज यांसारख्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर "वन हेल्थ" दृष्टिकोन, जो प्राणी, मानव आणि पर्यावरणीय आरोग्य यांचे एकत्रीकरण करतो, हा या परस्पर संबंधित समस्यांवर उपाय शोधण्यासाठी महत्त्वपूर्ण चौकट म्हणून उदयास आला आहे. या संगोष्ठीचा उद्देश या विषयांवर सखोल चर्चा करणे आणि नवोन्मेषी उपाय शोधण्यासाठी एक व्यापक बहुविषयक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे। प्रमुख व्याख्याने, तांत्रिक सत्रे, पॅनेल चर्चा आणि संवादात्मक मंचांद्वारे ज्ञानाची देवाणघेवाण, धोरणात्मक संवाद आणि संयुक्त संशोधनाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील। चर्चेमध्ये शाश्वत व हवामान-लवचिक पद्धतींचा प्रसार, जैव- सुरक्षा मजबूत करणे, उत्पादकता वाढविणे आणि दुग्ध व मत्स्य क्षेत्रातील मूल्य साखळी सुधारणे यावर भर दिला जाईल. कार्यक्रमात विविध विषयांचा समावेश आहे, जसे की- पशु आरोग्य व्यवस्थापन व झूनोटिक रोग नियंत्रण, कुक्कुटपालन उत्पादन, पशुधन जैव-सुरक्षा, दुग्ध उत्पादन व गुणवत्ता व्यवस्थापनातील नवकल्पना, दुग्ध मूल्य साखळी विकास, शाश्वत जलकृषी, जलीय प्राणी आरोग्य, समाकलित नैसर्गिक शेती प्रणाली तसेच ग्रामीण भारतात वन हेल्थ दृष्टिकोनाच्या अंमलबजावणीमध्ये डिजिटल तंत्रज्ञान व धोरणात्मक चौकटींची भूमिका ही दोन दिवसीय संगोष्ठी विविध संरचित सत्रांनी युक्त असेल. पहिला दिवस (11 एप्रिल 2026) रोजी सकाळी उद्घाटन कार्यक्रम होईल, ज्यामध्ये डॉ राघवेंद्र भट्ट हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. या कार्यक्रमाला डॉ. नितीन पाटील (कुलगुरू, MAFSU), डॉ उमेश शर्मा (अध्यक्ष, VCI), डॉ. नवीना महेश्वरप्पा यांच्यासह अनेक मान्यवर कुलगुरू, संचालक व वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहतील. यानंतर दुपारी तांत्रिक सत्रे आयोजित केली जातील, ज्यामध्ये पशुवैद्यकीय, मत्स्य व दुग्ध क्षेत्रांमध्ये वन हेल्थचा समन्वय यावर चर्चा होईल। "विकसित भारत" या संकल्पनेवर तसेच शाश्वत विकासात कृषी व संलग्न क्षेत्रांची भूमिका यावर विशेष सत्र आयोजित केले जाईल। संध्याकाळी पशुवैद्यकीय, मत्स्य व दुग्ध क्षेत्रांसाठी स्वतंत्र समांतर सत्रे आयोजित केली जातील, ज्यामध्ये कुक्कुटपालन आरोग्य, जलकृषी शाश्वतता, अन्न सुरक्षा, दुग्ध नवकल्पना आणि उद्योजकतेच्या संधी यांसारख्या विषयांवर तज्ज्ञ चर्चा करतील. दुसरा दिवस (12) एप्रिल 2026) रोजी कार्यक्रमाची सुरुवात "रोल मॉडेल सत्राने होईल, ज्यामध्ये यशस्वी उद्योजक व व्यावसायिक आपले अनुभव मांडून युवकांना नवकल्पना व उद्योजकतेसाठी प्रेरित करतील। त्यानंतर लघुधारक पशुपालन प्रणाली, ग्रामीण विकास उपक्रम आणि वन हेल्थ चौकटीखालील समुदाय आरोग्य हस्तक्षेप यावर तांत्रिक सत्र आयोजित केले जाईल तसेच, देशातील विविध भागांतील सहभागींच्या नेटवर्किंग साठी आणि भविष्यातील कृती आराखड्यासाठी विभागीय (झोनल) बैठका देखील घेतल्या जातील. ही संगोष्ठी MAFSU अंतर्गत असलेल्या प्रतिष्ठित नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयात आयोजित केली जात आहे, जे आपल्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी आणि पशुवैद्यकीय व संलग्न विज्ञान क्षेत्रातील योगदानासाठी ओळखले जाते. हा कार्यक्रम शैक्षणिक संस्था, उद्योग आणि धोरणनिर्माते यांच्यातील सहकार्य अधिक बळकट करण्यास मदत करेल.ॲग्रोव्हिसन ही प्रमुख आयोजक संस्था 2015 पासून कार्यरत असून कृषी व संलग्न क्षेत्रातील विद्यार्थी आणि व्यावसायिकांना एक समान व्यासपीठ उपलब्ध करून देते. ही संस्था नवकल्पना, उद्योजकता, धोरणात्मक सहभाग आणि सामाजिक जबाबदारी यांना प्रोत्साहन देते. भारत "विकसित भारत" या उद्दिष्टाकडे वाटचाल करत असताना या संगोष्ठीचे विशेष महत्त्व आहे। पशुवैद्यकीय, दुग्ध आणि मत्स्य क्षेत्रांचे बळकटीकरण हे केवळ शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठीच नव्हे तर अन्न व पोषण सुरक्षा, रोजगार निर्मिती आणि मजबूत ग्रामीण अर्थव्यवस्था उभारण्यासाठी अत्यावश्यक आहे. विविध घटकांना एकत्र आणून ही संगोष्ठी व्यावहारिक उपाय आणि धोरणात्मक सूचना निर्माण करण्याचा प्रयत्न करेल, जे तांत्रिक प्रगती, धोरणनिर्मिती आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरतील. याचे परिणाम भारतातील कृषी व संलग्न क्षेत्रांच्या दीर्घकालीन विकासात महत्त्वपूर्ण योगदान देतील. आयोजकांनी विश्वास व्यक्त केला आहे की ही संगोष्ठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल आणि बहुविषयक सहकार्याला चालना देत पुढील पिढीला शाश्वत व सक्षम कृषी प्रणाली उभारण्यासाठी प्रेरित करेल. ॲग्रीव्हिसनचे राष्ट्रीय संयोजक मनीष फाटे यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी डॉ. नितीन पाटील, (मा. कुलगुरू, MAFSU नागपूरचे), डीआय व डीन, (पशुवैद्यकीय विज्ञान) व आयोजन सचिव डॉ. शिरीष उपाध्ये, आयोजन समन्वयक शिवम पांडेय आणि प्रांत मीडिया संयोजक कु. वैष्णवी पांडेय उपस्थित होते

# भारतीय संविधानाचे आधुनिक निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर!

## पुसद येथे लेखक: जगदीश ओहोळ यांचे प्रतिपादन : धम्मक्रांती प्रज्ञापर्व कार्यक्रमाचे दुसरे पुष्प

**विदर्भ केसरी। पुसद विजय निखाते**





भारतीय संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्याही एका जाती-धर्माचे नव्हे तर या देशातील सर्वांचे उद्धारक आहेत. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अखिल मानव जातीच्या कल्याणाचे कार्य आहे. बाबासाहेबांनी या देशाला दिलेल्या संविधानावर आधुनिक भारत उभा राहिला आहे हे आजच्या पिढीने ते समजून घेतलं पाहिजे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते व 'जग बदलणारा बापमाणूस' पुस्तकाचे लेखक जगदीश ओहोळ यांनी पुसद येथे धम्मक्रांती प्रज्ञापर्वात दुसरे पुष्प गुंपताना बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.प्रशांत वासनिक होते प्रमुख अतिथी म्हणून राजूभाऊ सोळंके संजय राठोड, सुनील भालेराव, दिलीप पारध, डॉ रामचंद्र राठोड, प्रभाकर टेटर, मिलिंद जाधव, अरुण मनवर, गजानन जाधव, दीपक काळे, ऋषिकेश पंडितकर, सतीश नांदगावकर, श्रीराम पवार, ज्ञानेश्वर तडसे,विश्वास भवरे, देवेंद्र खडसे, दिगंबर वसेकर, आरिफ अहमद, धम्मक्रांती प्रज्ञापर्वाचे अध्यक्ष प्रा. सुनील खाडे यांच्यासह विचारपीठावर अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला समता महिला मंडळ व लुंबिनी महिला मंडळ यांनी सामाजिक बुद्ध वंदना सादर केली.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली रेवसे यांनी केले आभार प्रदर्शन उषा राजेश ढोले यांनी मानले. कार्यक्रमाला पुसद तालुक्यातील बहुसंख्येने बहुजन समाज बंद व बौद्ध धम्म बांधव महिला, युवक ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज दिनांक 10 एप्रिल रोजी यशवंत स्टेडियम पुसद येथे शाहिरी जलसा निर्मिक प्रस्तुत जागर समतेचा काव्य नाट्य संगीतमय आंबेडकर शाहीर जलसा मुंबई यांचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला बहुसंख्य बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रज्ञा प्रभू समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## सिलेंडर वितरण प्रणाली कोलमडली: रखरखत्या उन्हात नागरिकांच्या रांगा !

**विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**



बाळापूर : नागरिकांना वेळेवर सिलेंडर मिळत नसल्याने तालुक्यातील सिलेंडर वितरण प्रणाली कोलमडली असल्याने नागरिकांना रखरखत्या उन्हात रांगेत उभे राहावे लागत असल्या चे विदारक चित्र निर्माण झाले आहे. बदलत्या जीवन शैलीत सध्याच्या परिस्थितीत बहुतांश नागरिक गॅस सिलेंडर वर अवलंबून असल्याची वस्तुस्थिती आहे. मात्र मागील जवळपास एका महिन्यांपासून नागरिकांना वेळेवर गॅस सिलेंडर मिळत नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे. गॅस सिलेंडर बुकिंग प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही गॅस सिलेंडर मिळत नसल्याने नागरिकांच्या गॅस सिलेंडर दुकान समोर भर उन्हात लांबच लांब रांगा लागल्याचे दिसून येते आहे. तर मागील दोन महिने पूर्वीच लोकसभेत बजेट जाहीर करताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी प्रति गॅस सिलेंडर मागे साठ रुपये आधीच्या किमतीत वाढ असल्याचे जाहीर केले होते. त्यामुळे एकीकडे गॅस सिलेंडर मागे भाव वाढ तर दुसरीकडे मात्र सिलेंडर मिळण्यासाठी नागरिक त्रस्त असा दुहेरी मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याने मोठ्या प्रमाणात नागरिकांच्या कडून रोष व्यक्त करण्यात येत आहे. गॅस सिलेंडर चा कुठेही तुटवडा नसल्याचा गवगवा शासना कडून केला जात असला तरी एका सिलेंडर नागरिकांच्या निदर्शनास येत असलेल्या रांगा वेगळेच सांगून जातात. तसेच नागरिकांना गॅस बुकिंग प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अडिअडचणी सोडविण्यासाठी संमधीता कडून अतिरिक्त शुल्क आकारले जात जात असल्याचे सांगितले जात आहे. तर बुकिंग प्रक्रिया करून सुद्धा सिलेंडर वेळेत मिळत नाही परंतु काही भागात अतिरिक्त शुल्क घेऊन सिलेंडर कसे मिळते असा गंभीर प्रश्न नागरिकांच्या कडून उपस्थित केला जात आहे. त्याचप्रमाणे सिलेंडर मिळण्यासाठी रखरखत्या उन्हात रांगेत उभे राहावे लागत असलेल्या प्रसंगांमध्ये नागरिकांच्या तब्येतीवर रखरखत्या उन्हाचा विपरीत परिणाम होवून दुर्दैवी प्रसंग निर्माण झाल्यास जबाबदार कोण असाही नागरिकांच्या कडून प्रश्न उपस्थित केला जात आहे.

चंद्रपूर TODAY GOOD MORNING
BREKING NEWS
दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
शुक्रवार, दि. 10 एप्रिल 2026


» Selected

## प्राथमिक आरोग्य केंद्र महागाव येथे जागतिक आरोग्य दिन संपन्न..!



अहेरी :- तालुक्यातील प्रा. आ. केंद्र. महागाव अंतर्गत महागाव येथे जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी मा.नीती.आयोग भारत सरकार नवी दिल्ली यांच्या निदर्शनानुसार ANC RESISTRATION, ANC, CHECK UP SAM, MAM, कमी वजनाच्या बाळाची तपासणी, औषधोपचार करण्यात आला माझे गाव आरोग्य संपन्न गाव अंतर्गत आरोग्य शिबिर घेऊन आरोग्य सभा ,चर्चासत्र ,समुदाय समुपदेशन करण्यात आले.एकत्रित प्रयत्न आरोग्यासाठी विज्ञानाची साथ भविष्यासाठी हे घोषवाक्य सांगण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ अलका उईके यांनी मार्गदर्शन केले, यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील कर्मचारी, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

---

## समक्का–सरक्का मेदाराम येथे रवि बारसागंडी यांचे कुटुंबासह दर्शन..!



सिरोंचा :- समक्का–सरक्का मेदाराम येथे सिरोंचा तालुक्यातील भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे तालुका सचिव रवि बारसागंडी यांनी आपल्या कुटुंबासह भक्तिभावाने दर्शन घेतले. समक्का – सरक्का देवींच्या पवित्र स्थळी त्यांनी विधिवत पूजा-अर्चा करून राज्यातील नागरिकांच्या सुख, शांती व समृद्धीसाठी तसेच सिरोंचा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रार्थना केली. यावेळी त्यांच्या कुटुंबीयांसह पक्षाचे काही पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दर्शनानंतर रवि बारसागंडी यांनी भाविकांशी संवाद साधत सामाजिक एकात्मता, बंधुता आणि ग्रामीण भागातील विकासाच्या प्रश्नांवर चर्चा केली. त्यांनी समक्का–सरक्का देवींच्या जत्रेला लाखो भाविकांची उपस्थिती ही आदिवासी परंपरा, श्रद्धा आणि संस्कृतीचे जिवंत प्रतीक असल्याचे सांगितले. या पवित्र स्थळी भेट देणे ही स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी आध्यात्मिक समाधान देणारी क्षण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

---

## गडचिरोलीत भटक्या श्वानांचा उपद्रव : नागरिकांची सुरक्षितता धोक्यात



गडचिरोली :- तालुक्यातील पोर्ला परिसरात भटक्या श्वानांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत चालला असून, रस्त्यावर श्वानांच्या झुंडी थांबून बसल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिकांसाठी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. यापूर्वी श्वानांनी हल्ला केल्याच्या अनेक घटना घडल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. स्थानिक ग्रामपंचायतीकडे श्वानांचा नियंत्रण आणि बंदोबस्त करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# गॅस एजन्सीला जिल्हाधिका-यांची भेट..!

## स्टॉक रजिस्टरची पाहणी ; भरलेले आणि रिकामे सिलिंडरची मोजणी

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

चंद्रपूर आखाती युध्दाच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यात पेट्रोलियम पदार्थ, घरगुती सिलिंडरची मागणी, एजन्सीकडून होत असलेला पुरवठा, ग्राहकांना रोज वाटण्यात येणा-या सिलिंडरची संख्या आदी बाबी तपासण्यासाठी जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी गुरुवारी गॅस एजन्सी व सिलिंडरच्या गोदामला अकस्मिकपणे भेट दिली. यावेळी त्यांनी एजन्सीमध्ये असलेल्या स्टॉक रजिस्टरची पाहणी केली. तसेच भटाळी येथील गोदामला भेट देऊन प्रत्यक्ष भरलेले आणि रिकामे सिलिंडरची आकडेवारी घेतली. दीक्षाभुमी जवळ असलेल्या चेतक गॅस एजन्सीला आज (दि. 9) भेट दिल्यानंतर जिल्हाधिकारी पंत यांनी सुरुवातीला स्टॉक रजिस्टरची पाहणी केली. एजन्सीमध्ये उपस्थित असलेल्या ग्राहकांचे काम थांबवू नका, त्यांचे काम नियमितपणे करा, अशा सुचना एजन्सीच्या कर्मचा-यांना दिल्या. रोज किती ग्राहकांची बुकींग होते, सिलिंडर कसे उपलब्ध करून देता, रोजचा स्टॉक किती, यात घरगुती आणि व्यावसायिक सिलींडरची मागणी किती, उपलब्ध साठा, वाटप आणि शिल्लक सिलिंडर या बाबी नियमितपणे रजिस्टरमध्ये नोंद करता का, दुकानात आणि गोदाममध्ये किती सिलिंडर ठेवता, ग्राहकांना घरपोच वाटप होते का, आदी बाबींची माहिती जाणून घेऊन प्रत्यक्ष रजिस्टर सुद्धा तपासले. रजिस्टरमध्ये दैनंदिन भरलेली माहिती आणि गोदाममध्ये असलेल्या, भरलेले आणि रिकामे सिलिंडरच्या संख्येत तफावत तर नाही ना, याकरीता त्यांनी चेतक



गॅस एजन्सीचे भटाळी येथील गोदामला भेट दिली. तसेच व्यवस्थापकाकडून माहिती जाणून घेऊन सिलिंडरच्या स्टॉकचे रजिस्टरसुध्दा तपासले. एवढेच नाही तर भरलेले आणि रिकामे सिलिंडर आपल्यासमोर मोजण्यास सांगितले. दैनंदिन रजिस्टर मधील नोंदी आणि प्रत्यक्षात सिलिंडरची संख्या याची पडताळणी केली. अधिका-यांनी नियमितपणे तपासणी करावी : जिल्ह्यात घरगुती आणि व्यावसायिक सिलिंडरचा काळाबाजार होऊ नये, ग्राहकांना नियमितपणे सिलिंडरचे वाटप व्हावे, याकरीता अधिका-यांनी नियमितपणे गॅस एजन्सी आणि सिलिंडरच्या गोदामला भेटी देऊन तपासणी करावी, अशा सुचना जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिल्या. तपासणी दरम्यान जिल्हा पुरवठा अधिकारी राहुल बहादुरकर, अन्न धान्य वितरण अधिकारी सुमेध चवरे, खरेदी अधिकारी राहुल वानखेडे आदी उपस्थित होते.

यावेळी चेतक गॅस एजन्सीचे मालक अनंत लहामगे यांनी जिल्हाधिका-यांना सांगितले की, युध्दाच्या काळात नागरिकांमध्ये अफवा पसरल्याने एकाच वेळी ग्राहकांनी बुकींग केली. त्यामुळे सुरवातीला पुरवठा करण्यात अडचण निर्माण झाली. मात्र आता हळूहळू परिस्थतीत सुधारणा होत असून आमच्या एजन्सीमधून दररोज 350 ते 400 सिलिंडर वाटप केले जातात. पेट्रोलियम कंपन्यांकडूनही आता नियमितपणे सिलिंडरचा पुरवठा होत आहे. ऑनलाईन आणि ऑफलाईन सर्व रेकॉर्ड दैनंदिन नोंदविण्यात येतात.

### जिल्ह्यात सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध :

चंद्रपूर शहर व जिल्ह्यातील 15 तालुक्यांमध्ये पेट्रोल, डिझेल आणि सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून 8 एप्रिल 2026 रोजी जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या 10 लक्ष 69 हजार 746 लिटर पेट्रोल पैकी 1 लक्ष 90 हजार 392 लिटर पेट्रोलची विक्री होऊन 8 लक्ष 79 हजार 354 लिटर पेट्रोलचा शिल्लक साठा, डिझेलचा एकूण साठा 13 लक्ष 6 हजार 880 असून यापैकी 4 लक्ष 60 हजार 176 लिटर डिझेलची विक्री होऊन 8 लक्ष 46 हजार 704 लिटर डिझेलचा शिल्लक साठा तर 8 एप्रिल रोजी घरगुती सिलिंडरचा एकूण साठा 15208, यापैकी विक्री 6458 आणि शिल्लक सिलिंडरचा साठा 8750 आहे.

## धानोरा तालुक्यातील पुस्टोला क्लस्टरमध्ये एकात्मिक बोडी आधारित शेती पद्धती प्रकल्पास मंजुरी

**विदर्भ केसरी । धानोरा**

तालुक्यातील आदिवासी भागातील शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील पुस्तोला क्लस्टरमध्ये एकात्मिक बोडी आधारित शेती पद्धती प्रकल्पास नाबार्डकडून मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे आदिवासी कुटुंबांच्या उपजीविकेला बळकटी मिळणार असून, शेती अधिक किफायतशीर आणि टिकाऊ करण्यास मदत होणार आहे. नाबार्डच्या ट्रायबल डेव्हलपमेंट फंड अंतर्गत हा प्रकल्प राबविण्यात येणार असून, 'वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट' (WOTR) या संस्थेमार्फत त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत धानोरा तालुक्यातील पुस्टोला क्लस्टरमधील एकूण १५ गावांतील ४९१ कुटुंबांचा समावेश करण्यात आला आहे. प्रकल्पासाठी एकूण ४४७.८६ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यापैकी ३३७.६० लाख रुपये नाबार्डकडून अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच इतर समन्वयातून ३५.२८ लाख रुपये आणि लाभार्थ्यांचा ७४.९८ लाख रुपयांचा सहभाग राहणार आहे. विशेष म्हणजे, आदिवासी विकासाला नवे बळ देण्यासाठी यापूर्वी गोटा क्लस्टरमध्येही १५ गावांमध्ये एकात्मिक बोडी आधारित शेती प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी ४.३५ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर



करण्यात आला असून त्यामध्ये नाबार्डकडून ३.२८ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. या यशस्वी उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर पुस्तोला क्लस्टरमधील नवीन प्रकल्पाला अधिक गती मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे.या उपक्रमाद्वारे शेती, पशुपालन, जलसंधारण, उत्पन्नवाढ आणि पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा समन्वय साधून आदिवासी भागात सर्वांगीण विकास साधण्यावर भर दिला जाणार आहे. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती पद्धती विकसित करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने आदिवासी भागातील उपजीविका मजबूत करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले असून, या प्रकल्पाच्या माध्यमातून गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात आर्थिक स्थैर्य आणि स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला होणार आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, भौतिक व आर्थिक प्रगतीनुसार अनुदान वितरित केले जाणार आहे. यामुळे स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती, कृषी उत्पादनवाढ आणि जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## वैरागडच्या शिरपेचात मानाचा तुरा; चार तरुण गडचिरोली पोलीस दलात

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

वैरागड :- गडचिरोली जिल्ह्याच्या आरमोरी तालुक्यातील वैरागड येथील तरुणांनी आपल्या कतृत्वाने गावाची मान उंचावली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या पोलीस भरतीच्या निकालात वैरागड येथील चार गुणवंत उमेदवारांची गडचिरोली पोलीस (MH-33) दलात निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. गावासाठी अभिमानास्पद कामगिरी अत्यंत चिकाटीने आणि मेहनतीने अभ्यास व मैदानी चाचणी पूर्ण करून या तरुणांनी हे यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातील मुला-मुलींनी पोलीस दलात भरती होऊन देशसेवेचे स्वप्न


जानवी भैसारे दिपीका लांजेवार ज्ञानेश्वरी गुरनुले हर्षेल उपरे

पूर्ण केल्याने वैरागड गावासाठी ही बाब अत्यंत अभिमानास्पद ठरली आहे. या यशाबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. या निवडीमुळे गावातील इतर तरुण - तरुणींनाही प्रेरणा मिळाली असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. निवड झालेले गुणवंत उमेदवार: पोलीस दलात निवड झालेल्या खालील नावांचा समावेश आहे: १. जानवी भैसारे २. दिपीका लांजेवार ३. ज्ञानेश्वरी गुरनुले ४. हर्षेल उपरे

## राज्यात २५ लाख टन कांद्यावर होणार प्रक्रिया

**विदर्भ केसरी । मुंबई**


गत दोन वर्षांत कांदा दरात झालेल्या घसरणीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांना सुमारे १४०० कोटी रुपयांची मदत करण्यात आली. पण, दरातील चढ – उतार दरवर्षीचा प्रश्न आहे. त्यामुळे दरवर्षी किमान २५ लाख टन कांद्यावर प्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी सुमारे ८०० कोटी रुपयांची गरज लागेल, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावळ यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृह येथे एस – ४- एस टेक्नॉलॉजीजच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत मंत्री रावळ यांनी कांदा प्रक्रिया व साठवणुकीच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीस महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्कआणि मे. एस -४- एस टेक्नॉलॉजीजचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कांदा दरातील चढ -उतारांपासून संरक्षण मिळून स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी कांदा प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याची गरज आहे. पण, एक, दोन लाख टनांवर प्रक्रिया करून उपयोग नाही. किमान २५ लाख टन कांद्यावर प्रक्रियेची गरज आहे. त्यासाठी सुमारे ८०० कोटी रुपयांची गरज लागेल. ही रक्कम मोठी आहे, पण गत दोन वर्षांत कांदा उत्पादकांना नुकसानीपोटी १४०० कोटी रुपयांची मदत दिली होती. हा पैसा पायाभूत सुविधा किंवा साठवणूक सुविधा उभारण्यासाठी खर्च झाला नाही. सुमारे ८०० कोटी रुपये खर्च करून एकदा प्रक्रिया उद्योग उभारला तर दरवर्षी मोठ्या प्रमाणावर कांद्यावर प्रक्रिया करणे शक्य होईल. त्यामुळे कांदा दर स्थिर ठेवून शेतकऱ्यांना अधिकचा लाभ मिळवून देता येईल.

## शिंदेंवरील गाणे 'व्यवसायाचा भाग'; विशेषाधिकार समितीसमोर कुणाल कामराचे स्पष्टीकरण

**विदर्भ केसरी । मुंबई**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबनपर 'ठाणे की रीक्षा' या गाण्यामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या स्टँड-अप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी विधिमंडळाच्या विशेषाधिकार समितीसमोर आपली भूमिका स्पष्ट केली.

हे गाणे आपल्या व्यवसायाचा भाग असून त्यामध्ये कोणतीही चूक नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. विशेषाधिकार समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सुनावणीत कामरा यांची साक्ष नोंदविण्यात आली. या बैठकीत हक्कभंग प्रस्ताव मांडणारे आमदार




प्रवीण दरेकर यांचीदेखील साक्ष घेण्यात आली. सुनावणीदरम्यान कामरा यांनी आपल्या भूमिकेचे समर्थन करत सांगितले की, "व्यंग आणि विनोद मांडणे हा माझा व्यवसाय आहे. त्या अनुषंगाने तयार केलेल्या गाण्यातून समाजातील घडामोडींवर भाष्य केले आहे. त्यामुळे यात चुकीचे काहीही नाही." बैठकीत मराठीतून मांडण्यात येणारे मुद्दे समजण्यासाठी कामरा यांनी भाषांतरकाराची मदत घेतली. भाषांतरकाराने प्रत्येक मुद्दा समजावून सांगितल्यानंतरच कामरा यांनी समितीसमोर आपले उत्तर दिले. माफीबाबत स्पष्ट भूमिका नाही सुनावणीदरम्यान कामरा यांना बिनशर्त माफी मागण्याबाबत विचारण्यात आले असता त्यांनी तात्काळ निर्णय न देता, यावर आपल्या वकिलामार्फत उत्तर देणार असल्याचे सांगितले. त्यामुळे माफी मागण्याबाबतची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांनी सुनावणीनंतर माहिती देताना सांगितले की, पुढील निर्णय घेण्यापूर्वी कामरा यांच्याकडून काही अतिरिक्त कागदपत्रांची मागणी करण्यात आली आहे. त्यानंतरच या प्रकरणावर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. या प्रकरणामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा रंगली असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मर्यादा यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## वृत्तपत्र वाचवा.! 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे मुख्यमंत्र्यांना निवेदन..!

### मुद्रण खर्चात १५०% वाढ; जाहिरात दरवाढ व पत्रकारांना पेन्शन लागू करण्याची मागणी

**विदर्भ केसरी । अहेरी**

लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जाणारा वृत्तपत्र उद्योग सध्या वाढत्या महागाईमुळे आणि आर्थिक संकटामुळे अस्तित्वाच्या लढाईत अडकला आहे. कागद, मुद्रण साहित्य आणि विजेच्या दरात झालेल्या भरमसाठ वाढीमुळे राज्यातील वृत्तपत्रे, विशेषतः लघु व मध्यम स्वरूपाची प्रकाशने बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. या गंभीर पार्श्वभूमीवर, 'व्हॉईस ऑफ मीडिया' अहेरी शाखेच्या वतीने ८ एप्रिल रोजी तहसीलदारांमार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. आर्थिक गणिते कोलमडली, निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सन २०१९ पासून कागद आणि मुद्रण साहित्याच्या दरात तब्बल १५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र, शासनाच्या जाहिरात दरात त्या तुलनेत कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. यामुळे वृत्तपत्र चालवणे आता आर्थिकदृष्ट्या अशक्य झाले असून, हजारो कर्मचाऱ्यांचे आणि वृत्तपत्र मालकांचे भवितव्य धोक्यात आले आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या प्रमुख मागण्या:




**जाहिरात दरात वाढ:** शासकीय जाहिरात दरात किमान १५०% वाढ तातडीने लागू करावी. नियतकालिक देयके: जाहिरातींची बिले ३० दिवसांच्या आत अदा करावीत, विलंब झाल्यास त्यावर व्याज देण्यात यावे. समान संधी: जाहिरात वाटपात लघु व मध्यम वृत्तपत्रांना डावलले जाऊ नये, त्यांना समान संधी मिळावी. **पत्रकार कल्याण:** १० वर्षे सेवा असलेल्या पत्रकारांना 'अधिस्वीकृती' (Accreditation) कार्ड द्यावे आणि २० वर्षे सेवा व ५५ वर्षे पूर्ण झालेल्या पत्रकारांना 'पेन्शन' योजना लागू करावी. **ई-टेंडर सक्ती:** सर्व शासकीय ई-टेंडर आणि जाहिराती पूर्ण स्वरूपात वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची सक्ती कायम ठेवावी. पत्रकारांची एकजूट "वृत्तपत्र उद्योग मजबूत राहिला तरच लोकशाही आणि जनतेच्या अधिकारांचे रक्षण होऊ शकते," अशी भावना यावेळी उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केली. निवेदन देताना 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे तालुकाध्यक्ष मिलिंद खोंड, कार्याध्यक्ष अशोक पागे, सचिव पंकज नौनुरवार, उपाध्यक्ष अखिल कोलपाकवार, सदस्य अशोक आईंचवार, रफीक पठाण, रमेश बामनकर आदी उपस्थित होते.आता या ऐतिहासिक आर्थिक संकटात सापडलेल्या वृत्तपत्र उद्योगाला राज्य सरकार काय दिलासा देते, याकडे संपूर्ण माध्यमांचे लक्ष लागले आहे.

## अमेरिका - इराण युद्धला विराम!

**विदर्भ केसरी । मुंबई**

अमेरिका आणि इराणमध्यु युद्धविराम होऊन देखील होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सागरी वाहतूक सुरळीत झाल्याचे चित्र नाही. युद्धविरामानंतरही होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सागरी वाहतूक जवळजवळ ठप्प होती. दररोज १५ पेक्षा जास्त जहाजांना होर्मुझमधून जाण्याची परवानगी देणार नसल्याचे इराणच्या मंत्र्यांनी स्पष्ट केले आहे तर, जहाजांना सामुद्रधुनी ओलांडण्यासाठी लष्कराची परवानगी घ्यावी लागणार आहे. यामुळे ज्या अटीवर युद्धविराम झाला ती होर्मुझ सामुद्रधुनी खरचं खुली आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दिवसाला केवळ १५ जहाजांना परवानगी रॉयटर्स या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, 'युद्धविराम झाल्यानंतर गेल्या २४ तासांत एक तेलाचे जहाज, पाच ड्राय बल्क कॅरिअर गुरुवारी होर्मुझमधून बाहेर पडले आहेत. दोन इराणी टँकर देखील सामुद्रधुनीतून बाहेर आले', असे रॉयटर्सने म्हटले आहे. दरम्यान, इराण केवळ १५ जहाजांनाच




होर्मुझमधू बाहेर पडण्याची परवानगी देत आहे, असे वृत्त रशियाच्या टास (TASS) या वृत्तसंस्थेने इराणी अधिकाऱ्यांच्या हवाल्याने प्रसिद्ध केले आहे. अबू धाबी नॅशनल ऑइल कॉर्पोरेशनच्या प्रमुख सुलतान अल जाबेर यांनी ब्लूमबर्गशी बोलताना इराणने दिलेली सशर्त मंजुरी खऱ्या अर्थाने मंजुरी म्हणता येत नाही, असे मत नोंदवले आहे. इराणचे उप परराष्ट्र मंत्री, सईद खतीबजादेह यांनी होर्मुझ सामुद्रधुनीबाबत माहिती दिली आहे. होर्मुझ खुली असली तरी, प्रत्येक टँकर आणि जहाजाला सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार करण्यासाठी इराणी लष्कर आणि अधिकाऱ्यांकडून आवश्यक परवानगी घेणे गरजेचे आहे, असे खतीबजादेह म्हणाले.

### पाकिस्तानमध्ये होणार चर्चा

अमेरिका आणि इराणमध्ये झालेल्या युद्धविरामात होर्मुझ सामुद्रधुनीचा मुद्दा अत्यंत महत्वाचा होता. दोन्ही देशांनी याबाबत अटी ठेवल्याचे समोर आले. इराणने अमेरिकेसमोर ठेवलेल्या १० मुद्यांच्या प्रस्तावात होर्मुझवर टोल आकारण्याची मुभा आणि संपूर्ण नियंत्रणाचा उल्लेख आहे. तर, अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनी सुरक्षित आणि पूर्ण खुली करण्याच्या अटीवर शस्त्रसंधीचा प्रस्ताव मान्य केला, असे स्पष्ट केले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात पाकिस्तानमध्ये शांतात प्रस्तावावर चर्चा होणार आहे.



# शेफ व्हायचंय?

मित्रमैत्रिणींनो, तुम्ही रेस्टॉरंट्स, कॅफेमध्ये जेवायला जाता. तिथे छान छान पदार्थ मिळतात. या पदार्थांवर आकर्षक सजावट केलेली असते. कधी नेहमीच्याच पदार्थांना ट्विस्ट दिला जातो. हे सगळं शेफच्या मार्गदर्शनाखाली होत असतं. रेस्टॉरंट्समधल्या किचनचा सगळा ताबा शेफकडे असतो. मोठमोठ्या हॉटेल्समध्ये शेफना खूप मान असतो. हे कौशल्य विकसित करण्यासाठी तुम्ही कलनरी आर्टसशी संबंधित अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता.

स्वयंपाकाची आवड असणाऱ्यांना हे क्षेत्र खुणावतं. शेफ बनण्यासाठी तुमच्यात प्रयोगशीलता, कल्पकता असायला हवी.

काहीतरी नवं करून बघण्याची, नवं शिकत राहण्याची तयारी असायला हवी. भारतासह जगभरातल्या खाद्यपदार्थांचं, स्वयंपाकाच्या पद्धतींचं ज्ञान मिळवणं गरजेचं आहे. लोकांच्या आवडीनिवडींनुसार चविष्ट पदार्थ बनवण्याचं तंत्र तुम्ही अवगत करून घ्यायला हवं. यासोबतच संवादकौशल्य, संशोधनाची तयारी, व्यवस्थापनकौशल्य या बाबीही महत्त्वाच्या आहेत.

**कोण होणार?**

कोणत्याही शाखेतले विद्यार्थी कलनरी आर्टसकडे वळू शकतात. बारावीनंतर 'क्विजीन टेक्नॉलॉजी', 'हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी' किंवा 'हॉटेल मॅनेजमेंट' या विषयांमध्ये पदवी मिळवता येईल. यासोबत 'शेफ मॅनेजमेंट' या विषयात डिप्लोमा किंवा सर्टिफिकेट कोर्स करता येईल. पुरेशा अनुभवानंतर एक्झिक्युटिव्ह शेफ, सॉस शेफ, एक्सपिडिटर, कुक, कुक असिस्टंट म्हणून काम करू शकता. यासोबतच खाद्यपदार्थांशी संबंधित विविध कंपन्यांमध्येही संधी उपलब्ध असतात.




# उन्हाळ्यातला पेहराव

मुलांनो, आता उन्हाळा सुरु झाला आहे. तेव्हा या काळातील कपडे निवडताना काळजी घ्या. या उष्ण वातावरणात हलके आणि त्वचा श्वास घेऊ शकेल असे कपडे घालणे गरजेचे आहे. सूती किंवा लिनन कापड वापरले तर त्वचेला आरामदायक असते आणि ते घामही शोषून घेतात. म्हणूनच असे कपडे वापरा. कपड्यांचा रंग हलका असावा, कारण गडद रंग सूर्यप्रकाशात जास्त उष्णता शोषून घेतात. शर्ट आणि पँट्स किंवा शॉर्ट्स घालणे योग्य ठरेल. अशा कपड्यांमध्ये तुम्हाला आराम मिळेल. त्याचप्रमाणे बाहेर पडताना सनग्लासेस, हॅट किंवा कॅप वापरणेही गरजेचे आहे कारण या गोष्टी सूर्याच्या तीव्रतेपासून संरक्षण करतात.

**हे आहे गरजेचे**

**ठिपके जुळवा**



# एकसारखं टेन्शन येतंय?

छोट्या मित्रांनो, तुम्हाला कधीकधी ताणतणाव जाणवतो का? भीती वाटते का? असे होत असेल तर वेळीच आई-बाबांना सांगा कारण फार काळ या अवस्थेत राहिल्यास वाईट परिणाम बघायला मिळतात.

ताणतणावाच्या अवस्थेत शरीरात अचानक अॅड्रेनालाईन किंवा कॉर्टिसोल सारख्या ताण संप्रेरकांचा पूर येतो. परिणामी हृदयाचे ठोके वाढतात. रक्तदाब देखील वाढतो. म्हणजेच ताणतणाव केवळ हृदयावर आणि मनावरच नाही तर संपूर्ण शरीरावर परिणाम करतो. मात्र ताण उत्पन्न होण्याची परिस्थिती निवळल्यास तुम्हाला परत सामान्य वाटते. आधीसारखे बरे वाटू लागते. म्हणजेच आपले शरीर कमी प्रमाणात ताण सहन करण्यास तयार असते. परंतु ताण दीर्घकाळ किंवा दीर्घकालीन होतो तेव्हा मात्र वाईट परिणाम देणारा ठरतो, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

**असं का होतं?**

याचे आपल्या शरीरावर अनेक वाईट परिणाम दिसू शकतात. जसे की, पोटात काहीतरी जाणवते. एक विचित्र अस्वस्थता किंवा वेदना जाणवू शकतात. तीव्र ताण बराच काळ राहिला तर हृदयाच्या धमन्यांमध्ये जळजळ देखील होऊ शकते. छाती भरुन आल्यासारखी वाटते. तणावाचा सामना करताना कोलेस्टेरॉलच्या पातळीवरही परिणाम होतो. म्हणूनच फार काळ



तणावात राहू नका. तो टाळण्यासाठी कामाचे चांगले व्यवस्थापन करा. भरपूर मित्र बनवा आणि एकमेकांशी जोडलेले रहा. दरतोज व्यायाम करायला विसरू नका. दररोज रात्री चांगली झोप घ्या. या सगळ्यामुळे तुम्ही फ्रेश आणि तणावमुक्त राहू शकाल.

## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) 'नोकिया' ही कोणत्या देशातली कंपनी आहे?
२) सूर्यमालेतला हिरवा ग्रह कोणता?
३) बुकर पुरस्कार मिळवणारी भारतातली पहिली महिला लेखिका कोण?
४) भारतीयांनी विकसित केलेला पहिला सुपर कॉम्प्युटर कोणता?
५) क्युबा या देशाचं चलन कोणतं?
६) 'उगवत्या सूर्याचा देश' असं कोणाला म्हटलं जातं?
७) पाण्याचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांना काय म्हणतात?
८) आयसीआरएचं पूर्णरुप काय?
९) जगातला सर्वात मोठा पक्षी कोणता?
१०) भारतातला सर्वात लहान केंद्रशासित प्रदेश कोणता?


उत्तर : १) फिनलंड २) युरेनस ३) अरुंधती रॉय ४) परम ८००० ५) पेसो ६) जपान ७) हायड्रोलॉजिस्ट ८) इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च ९) शहामृग १०) लक्षद्वीप

# तिखटपणा मोजायचाय?

तिखट, मसालेदार पदार्थांमध्ये आई मिरचीचा वापर करत असल्याचे तुम्ही बघत असाल. पण मिरचीचा तिखटपणा केवळ चवीनुसारच नाही तर एका वैज्ञानिक प्रमाणानुसार मोजला जातो हे तुम्हाला माहिती आहे का? चला तर मग, आज या 'स्कोव्हिल स्केल' बाबत जाणून घेऊ या.

हे स्केल एका युनिटमध्ये मिरचीचा तिखटपणा मोजते आणि मिरचीमध्ये कॅप्सेसिन नावाचा घटक किती असतो हे सांगते कारण या घटकाचमुळेच आपले तोंड पोळते. थोडक्यात स्कोव्हिल स्केल हे वैज्ञानिक स्केल मसालेदार अन्नाचा तिखटपणा मोजण्यासाठी वापरला जाते.

हे अमेरिकन फार्मासिस्ट विल्बर स्कोव्हिल यांनी १९१२ मध्ये विकसित केले. मिरचीचा तिखटपणा मोजण्यासाठी स्कोव्हिल ऑर्गनोलेप्टिक चाचणी केली जाते. यामध्ये, मिरचीचा अर्क पाण्यात मिसळला जातो आणि नंतर पॅनेलमध्ये बसलेली एक टीम किती प्रमाणात पाणी घालावे याची चाचणी करते




जेणेकरून त्या मिरचीचा तिखटपणा जाणवू नये. जितके जास्त पाणी लागेल तितकी मिरची तिखट समजली जाते.


आता काही प्रसिद्ध मिरच्यांचे स्कोव्हिल रेटिंग जाणून घेऊ या.

**माहिती असावे**

* **बेल पेपर** – ही सर्वात सौम्य मिरची आहे आणि त्यात तिखटपणा अजिबात नाही.
* **जलापेनो** – ३,५००-८,००० एसएचयू (स्कोव्हिल हीट युनिट्स)
ही मिरची भारतीय जेवणातही खूप लोकप्रिय आहे आणि तिचा तिखटपणा मध्यम असतो.
* हबानेरो – १००,०००-३५०,००० एसएचयू
ही मिरची खूप तिखट असते आणि ती खाणे खूप आव्हानात्मक असू शकते.
* **कॅरोलिना रीपर** – १,४००,०००-२,२००,००० एसएचयू
ही जगातील सर्वात तिखट मिरची मानली जाते.
* **पेपर एक्स** – ३,१८०,००० एसएचयू
पेपर एक्स ही आतापर्यंतची सर्वात तिखट मिरची असल्याचे म्हटले जाते आणि तिखटपणाबद्दल गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये तिची नोंद झाली आहे.




# असा असतो चतुर



मित्रांनो, तुम्ही चतुर नावाच्या कीटकासोबत कधी खेळला आहात का? काही मुले त्याच्या शेपटीला दोरा बांधून अघोरी खेळही खेळतात. हे अगदी चुकीचे आहे. पण तुम्हाला या कीटकाबद्दल माहिती आहे का? नसेल तर हे नक्की वाचा.

मित्रांनो, चतुरला इंग्रजीत ड्रॅगन फ्लाय आणि हिंदीत व्याधपतंग असे म्हणतात. जगभरात त्याच्या हजारो जाती आहेत. बर्फाळ प्रदेश सोडला तर उष्ण आणि दाट प्रदेशात चतुरांचा वावर आढळतो. त्याचे शरीर तीन भागांमध्ये बनलेले असते. पहिल्या भागात दोन पाय असतात. पायांचा उपयोग आधार घेण्यासाठी तसेच धरून बसण्यासाठी होतो. चालण्यासाठी मात्र पायांचा उपयोग होत नाही. या कीटकाचा प्रत्येक पंख स्वतंत्रपणे हलू शकत असल्यामुळे उडण्याची क्षमता प्रचंड असते. म्हणजेच चतुर ५० ते ६० किमी. वेगाने उडू शकतो. तो जोरदार वाऱ्याचा सामनाही सहजपणे करु शकतो. तो हवेत घिरट्या घालू शकतो तसेच एकाच जागी बराच काळ उडतही राहू शकतो.


चतुराच्या संरचनेवर आधारितच विमान तयार करण्याचे तंत्र वैज्ञानिकांनी विकसित केले, असे काहीजण मानतात.

चतुर दिसायला अगदी सुंदर असतात. त्याचे डोळेही सुंदर असतात. डोळ्यांचे नीट निरीक्षण केले असता छोट्या-छोट्या आकारात हजारो लेन्सेस दिसतात. म्हणून त्याची नजर 'क्लीअरकट व्हिजन' असल्याचे आपण म्हणतो. चतुरांना डोकं कसंही, कुठेही वळवता येतं. त्यामुळे हव्या त्या कोनातून ते पाहू शकतात. चतुराला ३६० अंश कोनात दिसतं.

**भवताल**

चतुरांचं आयुष्यही एक गूढ प्रवास आहे. मादी आपली अंडी बहुधा तळ्याच्या किंवा डबक्याच्या काठावर तसेच चिखलात घालते. काही जातीत अंडी घालताना नर आणि मादी एकत्र उडतात. एकावेळेस मादी शेकडो ते हजारो अंडी घालते. काही आठवड्यात अंड्यांमधून अळ्या बाहेर पडतात. या अळ्या पूर्णपणे पाण्याखालीच जगतात. त्या कधी कधी दोन-तीन वर्षांपर्यंत पाण्यातच वावरतात पण पाण्यातून बाहेर पडताच अवघे सहा-सात महिनेच ते जगतात. जलचर छोटे किडे आणि मासे हे या अळ्यांचे भोजन असते.

# शेअर करा गुगल सर्च




मुलांनो, गुगल हे जगातलं सर्वात लोकप्रिय सर्च इंजिन आहे. इंटरनेट सर्फिंगसाठी तुम्ही गुगल क्रोमचा वापर करता. त्यावरचे सर्च रिझल्ट्स आपल्याला शेअर करायचे असतात. यासाठी यूआरएल कॉपी करून पेस्ट करण्याचा एक पर्याय आहे. यासोबत 'लेट मी गुगल दॅट फॉर यू' हा ऑप्शनही निवडला जातो. मात्र आता गुगलवरचे सर्च रिझल्ट्स थेट शेअर करता येणार आहेत. यासाठी गुगलने शेअर बटण उपलब्ध करून दिलं आहे. यामुळे अभ्यासाशी किंवा प्रोजेक्टशी संबंधित सर्च रिझल्ट्स झटपट शेअर करता येतील.

**स्मार्ट टॉक**

गुगल सर्च शेअर करण्यासाठी सर्वात आधी स्मार्टफोनमधलं गुगल अॅप ओपन करा. आता सर्च बारमध्ये जाऊन तुम्हाला हव्या असणाऱ्या माहितीसाठी सर्च द्या. यानंतर सर्च बारच्या उजव्या बाजूच्या शेअर आयकॉनवर टॅप करा. इथे रिझल्ट्स शेअर करण्याचे विविध पर्याय दिसतील. त्यापैकी एका पर्यायाची निवड करून तुमचे सर्च शेअर करता येतील. हा शेअरचा ऑप्शन सध्या फक्त अँड्रॉइडच्या बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे.

शेअर आयकॉनवर टॅप केल्यानंतर गुगल सर्च रिझल्ट्स शेअर करण्यासाठी एक लिंक उपलब्ध करून दिली जाईल. त्यात कॉपी फॉर क्लिपबोर्ड तसंच जीमेल, फेसबुक किंवा ड्रॉपबॉक्सच्या माध्यमातून शेअर करण्याचे पर्याय दिसतील. यापैकी एका पर्यायाची निवड तुम्ही करू शकता.

**धोका ओळखा**

## अशी घ्या काळजी

उन्हाळ्यात फिरताना काही धोके होऊ शकतात. त्यापासून बचाव करण्यासाठी खालील गोष्टी लक्षात ठेवा जसे की, कडक उन्हात फिरल्याने अंग जळजळते. सूर्याच्या तीव्र किरणांमुळे जळजळ होऊ शकते.

त्यामुळे घराबाहेर पडताना सनस्क्रीन लावणे आणि शक्यतो छत्री घेणे आवश्यक आहे. उन्हात फिरताना थकवा, मळमळ आणि गोंधळलेपण जाणवले तर थोडा वेळ विश्रांती घ्या. गारव्याला झाडाच्या सावलीखाली बसा. या काळात कीटकदंशापासून दूर राहण्यासाठी कीटकदंश प्रतिबंधक क्रीम किंवा स्प्रेचा अवश्य वापर करा.



**माहिती आहे?**

## असा तयार होतो माठ



उन्हाळ्यात आपण मातीच्या माठातील थंडगार पाणी पितो आणि तहान भागवतो. पण माठ तयार करण्याची प्रक्रिया तुम्ही जाणता का? मुलांनो, माठ तयार करण्यासाठी सर्वप्रथम गुळगुळीत आणि चिकट माती निवडली जाते. ती मऊ करण्यासाठी पाणी मिसळले जाते. नंतर चाकावर माती ठेवून हाताने किंवा साधनांचा वापर करून माठाचा आकार दिला जातो. माठाचा डोक्याचा भाग मोठा असतो. सजावटीसाठी त्यावर वेगवेगळे डिझाईन्स केली जातात. तयार झालेला माठाला थोडा वेळ उन्हात सुकवतात. नंतर त्यावर रंगकाम केले जाते. त्यामुळे तो सुंदर आणि टिकाऊ होतो.

**लक्षात घ्या**

## नको टीव्हीचा अतिरेक



टीव्ही जास्त पाहण्याचे काही तोटे आहेत. जसे की, टीव्ही जास्त पाहिल्याने शरिराची क्रियाशीलता कमी होऊ शकते. त्यामुळे वजन वाढणे आणि शरीर कमजोर होते. टीव्ही खूप वेळ पाहिल्याने डोळ्यांना ताण पडत असल्यामुळे डोळे दुखणे, चुरचुर, आणि दृष्टी कमी होणे हे त्रास संभवतात. सतत टीव्ही पाहण्यामुळे मानसिक विकासावरही परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर बाहेर खेळायला किंवा अभ्यास करण्यास वेळ मिळत नाही. मुख्य म्हणजे टीव्ही जास्त पाहण्यामुळे आपली सर्जनशीलता आणि शिकण्याची आवड कमी होऊ शकते. म्हणूनच सुट्टीच्या काळात टीव्ही कमी बघा आणि भरपूर खेळा.